**सामना** संभाजीनगर, मंगळवार, दि. २६ एप्रिल २०११

द
मुकुटच...
हिंदुस्थानला
ाचा निर्णय
ॉवर, डंकन
ळ प्रशिक्षक

## क्रीडांगण

# विजेतेच खेळांचे खरे ब्रॅण्ड ॲम्बेसेडर



**राज्य क्रीडा पुरस्काराचे वितरण**

मुंबई, दि. २५ (क्री.प्र)- हिंदुस्थानात क्रिकेटच नव्हे, तर अन्य खेळही प्रगतिपथावर आहेत. आपल्या खेळांचा प्रचार आणि प्रसार आपल्यालाच करायचा आहे. राज्य क्रीडा पुरस्कार विजेते खेळाडू आणि संघटकच खेळाचे खरे ब्रॅण्ड ॲम्बेसेडर आहेत. त्यांनीच आपल्या खेळाला सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवायला हवे, असे प्रतिपादन करून ११ कोटी महाराष्ट्रीय जनतेकडून पुरस्कार विजेत्यांचे अभिनंदन केले.

राज्य क्रीडा पुरस्कार २००८-०९ वितरण सोहळ्यानिमित्त राज्य सरकारने ४४ खेळाडूंचा जाहीर सत्कार केला. याप्रसंगी मुख्यमंत्र्यासह क्रीडामंत्री पद्माकर वळवी,अन्न व नागरी पुरवठा मंत्री अनिल देशमुख आणि आमदार ॲनी शेखर उपस्थित होत्या.या सोहळ्याप्रसंगी मुख्यमंत्र्यांनी आपल्या भाषणात नेहमीप्रमाणे आश्वासनांचा पाऊस पाडला आणि गेल्या दोन वर्षांपासून शिजत असलेल्या क्रीडा धोरणावर शेवटचा हात फिरवला जात असल्याची फुसकी माहिती दिली. आपल्या शासनाच्या मागील घोषणांचाच पाढा वाचताना त्यांनी क्रीडा संकुलांचा निधी वाढवल्याची आनंदाची बातमी दिली. तालुक्यांसाठी दिला जाणारा निधी २५ लाखांवरून १ कोटी आणि जिल्ह्यांसाठी दिला जाणारा ४ कोटींची निधी १६ कोटी असा चौपट केल्याची घोषणा केली. एवढेच नव्हे, तर १६ कोटींचा विभागीय निधी २४ कोटींपर्यंत वाढवल्याचेही त्यांनी सांगितले. तसेच नागपूर येथे विशेष क्रीडा संकुल बांधण्यासाठी ४० कोटींची तरतुद , ५४ क्रीडा संकुलांच्या निर्मितासाठी पावले उचलणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. हिंदकेसरी मारुती माने यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ त्यांच्या कवठेपिरान या गावीच त्यांचे स्मारक बांधणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

### *नेते फिरकलेच नाहीत*

*क्रिकेटसाठी नेहमीच राजकीय नेत्यांची जत्रा भरलेली दिसते. पण आज राज्य क्रीडा पुरस्कार सोहळ्याला खेळाडूंच्या सत्कारसोहळ्याला उपमुख्यमंत्री अजित पवार, ग्रामविकास मंत्री जयंत पाटील, क्रीडा राज्यमंत्री भास्कर जाधव फिरकलेच नाहीत. या मंत्र्यांची निमंत्रण पत्रिकेवर नावे होतीच. सोबत स्टेजच्या मागे लावलेल्या बॅकड्रॉपवर फोटोही झळकत होत, पण प्रत्यक्षात ते झळकले नाहीत.*

**शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवन गौरव पुरस्कार**

चंद्रकांत शिरोळे (पुणे), गणपतराव आंदळकर (कोल्हापूर),

**उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार**

गोकुळ कामत- जलतरण (उपनगर), अरुण देशमुख - खो-खो (मुंबई शहर), संजय सातपुते -सायकलिंग (पुणे),

**जिजामाता राज्य क्रीडा पुरस्कार**

शैलेजा जैन- कबड्डी (नाशिक)

**शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार**

ॲथलेटिक्स : विजयमाला पाटील - (कोल्हापूर), आट्यापाट्या: सुजाता लाडोळे, लौकीक फुलकर (दोन्ही यवतमाळ), संपदा सहस्त्रबुद्धे - बॅडमिंटन (पुणे), बेन्चप्रेस: रक्षा महाराव (मुंबई), दिपाली कुलकर्णी, रामदास खरात (ठाणे), स्नेहांकिता वरुटे (कोल्हापूर), माणिक ठोसरे (पुणे), कबड्डी : रिबेका गवारे (मुंबई), नितीन घुले, दीपिका जोसेफ (पुणे), राजेश्री पवार (मुंबई), कुस्ती : राहुल आवारे (पुणे), जलतरण : पूर्वा शेटे (मुंबई), डायव्हिंग : पूनम शहा (सोलापूर), जिम्नॅस्टिक्स : अक्षता शेटे (मुंबई), तारक दास (संभाजीनगर), हॅण्डबॉल : बीना खडकुंबर्गे (पुणे), खो-खो : शिल्पा जाधव, साकेत जेस्ते (मुंबई), मल्लखांब : ऋुता देशमुख, पंकज शिंदे (पुणे), नेमबाजी : प्रिया अग्रवाल (पुणे), अशोक कारंडे (मुंबई), पॉवरलिफ्टिंग : संदीप आवारी (ठाणे), स्केटिंग : मानसी भिडे, आकाश खत्री (पुणे), सायकलिंग : प्रियंका देसाई (सातारा), टेबलटेनिस : मधुरिका पाटकर (ठाणे), अनिकेत कोपरकर (पुणे), तायक्वॉंदो : श्रद्धा भट (पुणे), तलवारबाजी : संयुक्ता सोमवंशी (अमरावती), डॉ. उदय डोंगरे (संभाजीनगर), वॉटरपोलो : पायल अजमिरे (अमरावती),

**एकलव्य राज्य क्रीडा पुरस्कार**

संजय भोसकर - ॲथलेटिक्स, टेबल टेनिस, पॉवरलिफ्टिंग, तलवारबाजी(नागपूर), ज्योती जाधव - ॲथलेटिक्स (कोल्हापूर).

**विशेष पुरस्कार ( साहसी उपक्रम )**

स्नेहल कदम - खाडी/समुद्र पोहणे (सातारा)

# पुरस्कार मिळाले; आता 'रोल मॉडेल' व्हा!

## 'छत्रपती पुरस्कार' वितरणात मुख्यमंत्र्यांचा पुरस्कार विजेत्यांना सल्ला

सकाळ वृत्तसेवा

मुंबई, ता. २५ : तुमच्यातील गुणवत्ता आणि क्षमतेच्या जोरावर उत्तम कामगिरी करून राज्याची आणि देशाची शान उंचावलीत आणि त्याला पोचपावती म्हणून 'छत्रपती क्रीडा पुरस्कार' मिळाला आहे. आता पुढची पिढी घडविण्यासाठी तरुण आणि होतकरू खेळाडूंसाठी आपापल्या खेळाचे ब्रॅंड ॲम्बेसिडर तसेच तरुण खेळाडूंसाठी रोल मॉडेल व्हा, असा सल्ला मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी छत्रपती पुरस्कार विजेत्यांना दिला.

प्रदीर्घ काळ लांबल्यानंतर जाहीर झालेल्या २००८-२००९ या वर्षातील छत्रपती पुरस्कार वितरण आज पृथ्वीराज चव्हाण यांच्या हस्ते पार पडले. फक्त क्वचितप्रसंगी त्या त्या वर्षांचे पुरस्कार त्या त्या वर्षी दिले जातात. गेल्या दोन वर्षांतील पुरस्कार विजेत्यांचा गौरव करताना २०१०-२०११ चे पुरस्कार लवकरच दिले जातील, अशी घोषणा नेहमीप्रमाणे करण्यात आली.

### आशावाद

पृथ्वीराज चव्हाण यांच्या हस्ते झालेला हा पहिलाच छत्रपती पुरस्कार वितरण समारंभ होता. क्रीडा धोरणापासून क्रीडा प्रबोधिनी, क्रीडा संकुल ते खेळाडूंसमोर आताच्या खेळाडूंनीही आदर्श उभा करण्याचे अनेक मुद्दे त्यांनी आपल्या भाषणात मांडले आणि महाराष्ट्र 'स्पोर्टस् पॉवर' म्हणून पुढे येईल, असा आशावादही व्यक्त केला. 'यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान'मध्ये झालेल्या या समारंभासाठी नेहमीप्रमाणे गर्दी झाली होती. पुरस्कारविजेत्या खेळाडूंचे कुटुंबीय, मित्र अशांची गर्दी अधिक होती. संस्कृती ही वारशाने मिळते;



शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारासह तारक दास.

पण ती जपावी लागते. आपल्यासमोर आव्हाने मोठी आहेत. राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये रेल्वे, तसेच राज्यांच्या संघांपेक्षा चांगली कामगिरी करायची आहे, अशी जाणीव मुख्यमंत्र्यांनी करून दिली.

### क्रीडा धोरण प्रगतीवर

क्रीडा धोरण हा राज्याच्या क्रीडा क्षेत्रात सर्वांत महत्त्वाचा विषय आहे. नवे क्रीडा आणि युवक धोरण लवकरच जाहीर होईल, एवढेच आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले. राज्याच्या संकेतस्थळावर आम्ही या धोरणासंदर्भात माहिती दिलेली आहे आणि सूचना मागविल्या आहेत. या सर्वांचा अभ्यास केल्यानंतर क्रीडा धोरण जाहीर केले जाईल, असे ते म्हणाले. पण त्याच्या कालावधीचा उल्लेख केला नाही.

### नागपूरसाठी ४० कोटी

गाव तेथे क्रीडांगण, क्रीडा प्रबोधिनी असे मुद्दे मुख्यमंत्र्यांच्या भाषणात वारंवार येत होते. यावरून त्यांना ग्रामीण भागात क्रीडा संस्कृती वाढली पाहिजे याची तळमळ दिसून आली असली तरी त्यांनी आतापर्यंत जे घडत आले आहे त्याचीच माहिती दिली. पण क्रीडा संकुले उभी करण्यासाठी वाढीव निधीची घोषणा करताच त्यांना टाळ्यांनी दाद देण्यात आली. या वाढीव निधीनुसार तालुकावार क्रीडा संकुलासाठी १ कोटी, जिल्ह्यासाठी ८ कोटी, विभागवार क्रीडा संकुलासाठी २४ कोटी, तर उपराजधानी असल्यामुळे नागपूरला ४० कोटी देण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली.

### सचिनचे संग्रहालय

मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरचा विशेष उल्लेख मुख्यमंत्र्यांनी आपल्या भाषणात केला. त्याच्या अतुलनीय योगदानाला सलाम म्हणून त्याचे भव्य क्रीडा संग्रहालय उभारण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी दिले.



मुंबई : मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या हस्ते सोमवारी शिवछत्र
औरंगाबादचा डॉ. उदय परमेश्वर डोंगरे.




या- : प्रदीप कोचरेकर

## शिवछत्रपती पुरस्कार विजे

शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवन गौरव पुरस्कार : चंद्रकांत माधवराव शिरोळे (पुणे), गणपतराव पाटील- आंदळकर (हिंद केसरी) (कोल्हापूर). उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार : गोकुल कामत (मुंबई उपनगर), अरुण देशमुख (मुंबई शहर), संजय सातपुते (पुणे). जिजामाता राज्य क्रीडा पुरस्कार : शैलजा जैन (नाशिक), तसेच शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (खेळाडू) : विजयमाला पाटील, ॲथलेटिक्स (कोल्हापूर); सुजाता लाडोळे, आट्यापाट्या (यवतमाळ); लौकिक फुलकर, आट्यापाट्या (यवतमाळ); संपदा सहस्रबुद्धे, बॅडमिंटन (पुणे); रक्षा महाराव, बेंचप्रेस (मुंबई); दीपाली कुलकर्णी, बेंचप्रेस (ठाणे); स्नेहांकिता वरुटे, बेंचप्रेस (कोल्हापूर); माणिक ठोसरे, बेंचप्रेस (पुणे); रामदास खरात, बेंचप्रेस (ठाणे); रिबेका गवारे, कबड्डी (मुंबई); दीपिका हेन्री जोसेफ, कबड्डी (पुणे); राजेश्री रघुनाथ पवार, कबड्डी (मुंबई); नितीन घुले, कबड्डी (पुणे); राहुल आवारे, कुस्ती (पुणे); पूर्वा शेट्ये, जलतरण (मुंबई); पूनम शहा,

डायव्हिंग
जिम्नॅस्टि
जिम्नॅस्टिक
हॅण्डबॉल
(मुंबई);
ऋता देश
शिंदे, मल
नेमबाजी (
(मुंबई);
(ठाणे);
आकाश
देसाई, स
पाटकर, टे
कोपरकर,
तायक्वाँदो
तलवारबाज
तलवारबाज
वॉटरपोलो
पुरस्कार (
(खाडी/ स
तसेच एक
संजय भोर
कोल्हापूर.

लोकमत | गुरुवार, दि. २५ ऑगस्ट २०११

# तलवारबाजीत शिवाजी महाविद्यालयाला विजेतेपद

**औरंगाबाद**| दि. २४ (क्रीडा प्रतिनिधी)

घाटनांदुर येथे नुकत्याच झालेल्या आंतरमहाविद्यालयीन तलवारबाजी स्पर्धेत कन्नड येथील शिवाजी महाविद्यालयाने विजेतेपद पटकावले. त्यांच्या रामेश्वर दळवी, शीतल मुळे यांनी सुवर्ण, स्वाती मोरेने रौप्य आणि अमर गिरी, पंडित कांबळे, संदीप अहिरे यांनी कांस्यपदक पटकावले. या खेळाडूंना डॉ. उदय डोंगरे यांचे मार्गदर्शन लाभले.



आंतरमहाविद्यालयीन तलवारबाजी स्पर्धेत विजेतेपद पटकावणारा कन्नडचा शिवाजी महाविद्यालय संघ. सोबत प्राचार्य विजय भोसले, डॉ. उदय डोंगरे आदी.

सकाळ औरंगाबाद TODAY
शुक्रवार, २६ ऑगस्ट २०११






कन्नड : शिवाजी महाविद्यालय, सावित्राबाई फुले कन्या विद्यालय व डॉ. भीमराव आंबेडकर कनिष्ठ महाविद्यालयातर्फे अण्णा हजारे यांना पाठिंब्यासाठी फेरी काढण्यात आली. या वेळी प्राचार्य डॉ. विजय भोसले, उपप्राचार्य मगर यांच्यासह प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी. (छायाचित्र : शर्मा)

कन्नड

कन्नड (बातमीदार) : छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या शिवाजी महाविद्यालय, डॉ. भीमराव आंबेडकर कनिष्ठ महाविद्यालय, सावित्रीबाई फुले उच्च माध्यमिक विद्यालय व इतर सर्व शाळांमधील विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक यांनी बुधवारी (ता. २४) फेरी काढली.

या फेरीत शिवाजी महाविद्यालयातील संगीत, सांस्कृतिक विभागाचे विद्यार्थी, राष्ट्रीय सेवा योजना, हरितसेना, एन.सी.सी.चे विद्यार्थी सहभागी झाले. या फेरीत प्राचार्य डॉ. विजय भोसले, उपप्राचार्य बी. के. मगर, प्रा. के. के. गीतखाने, डॉ. अनिल क्षीरसागर, डॉ. रमेश सूर्यवंशी, प्रा. भीमराव जाधव, प्रा. डी. टी. साखरे, प्रा. बी. एच. गायकवाड, डॉ. युसूफ शेख, प्रा. एस. बी. कोल्हे, प्रा. संजय भालेराव, प्रा. विश्वंभर देशपांडे, अतिष मेहेत्रे. प्रा. दादासाहेब शिंदे, डॉ. गोविंद बुरसे, प्रा. रवींद्र वाघमारे, प्रा. पोपटराव आव्हाळे, प्रा. सलगरे, प्रा. शिवाजी हुसे, प्रा. रणजित पवार, प्रा. बी. जे. देशमुख, कॅप्टन व्ही. के. देशमुख, प्रा. घनेधर, प्रा. श्रीमती वडगुले, प्रा. भेलेंडि, बाबूलाल काळे, अशोक आहेर, राजेंद्र शेलार, डॉ. गोरडे, डॉ. रामचंद्र झाडे, डॉ. भीमराव आंबेडकर, कनिष्ठ महाविद्यालयातील प्रा. रंगनाथ लहाने, प्रा. समाधान सिरसाठ, प्रा. प्रकाश खेत्री, प्रा. एस. बी. नवले, प्रा. प्रकाश ठाकरे, सावित्रीबाई फुले कन्या विद्यालयाचे मुख्याध्यापक अरविंद कांबळे, आर. एस. पवार, पुरुषोत्तम बागूल, सुभाष गोरे, संजय जाधव, आर. एम. पवार, सुभाष मोहिते, के. बी. अंदुरे, एम. के. बाविस्कर, आर. एस. टेकाळे, डी. बी. शेलार, के. बी. गवळी, एस. आर. पवार, जे. व्ही. सोनार, एस. एस. गायकवाड सहभागी झाले होते. नायब तहसीलदार एन. बी. उपाध्ये, गोपीनाथ आदीक, देवीदास राठोड, सतीश भदाणे, बी. एस. पठाण, पोलिस निरीक्षक के. बी. पवार यांना प्राचार्य डॉ. विजय भोसले, आर. एस. पवार, डॉ. रमेश सूर्यवंशी, प्रा. जे. पी. मोहिते आदींनी निवेदन दिले.

सकाळ
औरंगाबाद, सोमवार,
१ ऑक्टोबर २०१२
औरंगाबाद TODAY



कन्नड : शिवाजी महाविद्यालयात चारशे मीटर ट्रॅकचे उद्घाटन डॉ. जी. श्रीनिवास यांनी केले. मानसिंग पवार, डॉ. पी. के. निकम, डॉ. डी. डी. शिंदे, अशोक आहेर, दिलीप नागदकर, प्राचार्य डॉ. विजय भोसले, डॉ. उदय डोंगरे, डॉ. नारायण वाकळे उपस्थित होते.

# धावण्याच्या चारशे मीटर ट्रॅकचे शिवाजी महाविद्यालयात उद्घाटन

## कन्नड तालुक्यातील पहिलाच ट्रॅक, खेळाडूंना मोफत संधी

**कन्नड, ता. ३० (बातमीदार)** : श्री छत्रपती शिवाजी शिक्षणप्रसारक मंडळाच्या शिवाजी महाविद्यालयाने चारशे मीटर ट्रॅकची बांधणी केली आहे. ट्रॅकचे उद्घाटन विद्यापीठ अनुदान आयोगाचे पश्चिम विभागीय कार्यालयाचे सहसचिव डॉ. जी. श्रीनिवास यांच्या हस्ते झाले.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना विविध खेळांमध्ये उच्चपातळीवर खेळण्याची संधी मिळावी; तसेच पोलिस व सैनिकी भरतीपूर्व प्रशिक्षण मिळावे, यासाठी उभारलेला कन्नड तालुक्यातील हा पहिलाच ट्रॅक आहे. उद्घाटनप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष मानसिंग पवार, सचिव डॉ. पी. के. निकम, कोषाध्यक्ष डॉ. डी. डी. शिंदे, कनिष्ठ महाविद्यालयाचे अध्यक्ष अशोकराव आहेर, संचालक दिलीप नागदकर, कृष्णराव गव्हालीकर, प्राचार्य डॉ. विजय भोसले, डॉ. नारायणराव वाकळे, क्रीडा विभागप्रमुख डॉ. उदय डोंगरे, प्रा. वामन चव्हाण, प्रा. व्ही. के. देशमुख आदींची प्रमुख उपस्थिती होती. शिवाजी महाविद्यालयाने कन्नड तालुक्यात विविध क्रीडा प्रकार रुजविण्यासाठी क्रीडा शिक्षक, क्रीडाप्रेमी, क्रीडा संघटक यांना एकत्रित करून तालुका क्रीडा संघटनेची बांधणी कली आहे. महाविद्यालयातील मैदाने, क्रीडा साहित्य, खेळाडूंना व क्रीडाप्रेमींना मोफत खुले करण्यात आली आहेत. कुस्तीसाठी महाविद्यालयातील मॅट उपलब्ध करून प्रशिक्षण शिबिरही सुरू करण्यात आले आहे. चारशे मीटर ट्रॅकदेखील सर्व विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरणार आहे, असे मान्यवरांनी नमूद केले.

6

14
लोकमत समाचार
औरंगाबाद, शुक्रवार 2 नवंबर 2012
www.epaper.lokmatsamachar.com

# शिवाजी कॉलेज के तलवारबाज चमके

## अंतर महाविद्यालयीन तलवारबाजी, बालक-बालिका दोनों वर्गों में मारी बाजी



औरंगाबाद में डॉ बाबासाहब आंबेडकर मराठवाड़ा विश्वविद्यालय की ओर से आयोजित अंतर महाविद्यालयीन तलवारबाज़ी प्रतियोगिता के तहत सफल खिलाड़ियों के साथ डॉ आप्पासाहब हुंब, प्राचार्य पीवी अष्टेकर, डॉ उदय डोंगरे, गोकुल तांदले आदि.

औरंगाबाद। 1 नवंबर (खेल संवाददाता).

डॉ बाबासाहब आंबेडकर मराठवाड़ा विश्वविद्यालय की ओर से आयोजित अंतर महाविद्यालयीन तलवारबाजी प्रतियोगिता में लड़कों के वर्ग में शिवाजी महाविद्यालय के तलवारबाजों ने बेहतरीन प्रदर्शन करते हुए स्वर्ण पदक जीतकर खिताब अपने नाम किया. शिवाजी महाविद्यालय, कन्नड़ ने 12 अंकों के साथ विजेता पद पर कब्जा किया. वहीं, एमआईटी, सतारा परिसर उपविजेता पद अपने नाम करने में सफल रहा. जबकि एमआईटी, एन-4 तीसरे स्थान पर रहा.

लड़कियों के वर्ग में भी शिवाजी महाविद्यालय, कन्नड़ का ही वर्चस्व रहा. उसने कुल 10 अंकों के साथ विजेता बनने का गौरव हासिल किया. इसी तरह, शिव छत्रपति महाविद्यालय तथा वसुंधरा महाविद्यालय, बीड़ तथा एमएसएम क्रमशः दूसरे तथा तीसरे स्थान पर रहे.

### परिणाम

क्रमश : स्वर्ण, रजत, कांस्य पदक विजेता

**बालक** : इप्पी - संजय कुमार, आकाश अरमल, प्रदीप ढवरे, सागर मगरे. फॉइल - स्वप्निल तांगड़े, अनिकेत शेलके, सागर मगरे, शरद सुरवड़े. साइबर - सुदर्शन भुतेकर, स्वप्निल तांगड़े, अनिकेत थोरात, रमेश सूर्यताल.

**बालिका** : इप्पी - स्नेहा ठेपे, पल्लवी देशमुख, सयाली भगत, अमृता मानकर. फॉइल - राखी जाधव, सुनीता चाटे, रूपा शर्मा, शेख अजमिन.

इससे पहले डॉ आप्पासाहब हुंब के हाथों प्रतियोगिता का उद्घाटन किया गया. प्राचार्य पीवी अष्टेकर ने कार्यक्रम की अध्यक्षता की. इस अवसर पर प्रा पांडुरंग रणमाल, डॉ उदय डोंगरे, गोकुल तांदले आदि उपस्थित थे. कार्यक्रम की सफलता के लिए रैफरी पंच वंजारे, महेश तवार, सूरज लिपणे, स्वप्निल शेलके, प्रा राकेश खैरनार, प्रा प्रदीप बोरसे, सुभाष महालिंगे, रविराज भुमरे आदि प्रयासरत रहे.सभी सफल खिलाड़ियों का कॉलेज प्रबंधन तथा शिक्षकों की ओर से अभिनंदन किया गया.

गुरुवार, दि. २१ फेब्रुवारी २०१३ आठ सामना



पटियाला येथील विद्यापीठात पार पडलेल्या राष्ट्रीय तलवारबाजी स्पर्धेत शिवाजी महाविद्यालय, कन्नडच्या खेळाडूंनी रौप्यपदक पटकावले. संघात आकाश आरमाळ, स्वप्निल तांगडे व स्नेहा ढेपे या खेळाडूंचा समावेश होता. विजयी खेळाडूंचे अभिनंदन करताना मानसिंग पवार, डॉ. विजय भोसले, डॉ. उदय डोंगरे.

सकाळ गुरुवार, २१ फेब्रुवारी २०१३



औरंगाबाद : कन्नड येथील शिवाजी महाविद्यालयाच्या तलवारबाजीतील उत्कृष्ट खेळाडूंचा श्री छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मानसिंग पवार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्या वेळी उदय डोंगरे (डावीकडून), स्नेहा ढेपे, आकाश अरमाळ, स्वप्नील तांगडे, विजय भोसले, श्री. पवार.

# आकाश, स्वप्नील, स्नेहा तलवारबाजीत उत्कृष्ट

औरंगाबाद, ता. २० : कन्नड येथील शिवाजी महाविद्यालयाच्या आकाश अरमाळने पतियाळातील पंजाबी विद्यापीठामध्ये आयोजित आंतरविद्यापीठ तलवारबाजी स्पर्धेमध्ये रौप्यपदक पटकावण्याची किमया साधली.

तो इप्पी प्रकारात विद्यापीठ संघात होता. स्वप्नील तांगडे, स्नेहा ढेपे या महाविद्यालयातील अन्य तलवारपटूंनीही स्पर्धेत विद्यापीठ संघातर्फे सुरेख कामगिरी बजावली. श्री छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मानसिंग पवार यांच्या हस्ते या खेळाडूंना सन्मानित करण्यात आले. प्राचार्य विजय भोसले, क्रीडा विभागप्रमुख डॉ. उदय डोंगरे या खेळाडूंचे मार्गदर्शक आहेत.

सकाळ गुरुवार, २२ ऑगस्ट २०१३

# कन्नडच्या शिवाजी महाविद्यालयात तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा रंगल्या

**कन्नड, ता. २१ (बातमीदार)** : तालुकास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धांना येथील शिवाजी महाविद्यालयाच्या प्रांगणावर सोमवारी (ता. १९) व मंगळवारी (ता. २०) घेण्यात आल्या. प्राचार्य डॉ. विजय भोसले यांनी नाणेफेक करून स्पर्धेचे उद्‌घाटन केले. या दोन दिवसांत खो-खो स्पर्धा घेण्यात आल्या. उर्वरित कबड्डी, कुस्ती, हॉलिबॉल या खेळांच्या स्पर्धा ता. १० ते ता. १३ सप्टेंबर रोजी होणार आहेत.

खो-खो स्पर्धेचा निकाल असा : खो-खो १४ वर्षांखालील (मुली) प्रथम : पुंडलिकराव पाटील विद्यालय (मोहरा),

द्वितीय : जिल्हा परिषद प्रशाला (नागद), १७ वर्षांखालील (मुली) प्रथम : पुंडलिकराव पाटील विद्यालय (मोहरा), द्वितीय : सावित्रीबाई फुले कन्या विद्यालय (कन्नड), १९ वर्षांखालील (मुली) : प्रथम : श्री गणेश कनिष्ठ महाविद्यालय (देवगाव रंगारी), १६ वर्षांखालील पायका (मुली), प्रथम : समता कन्या विद्यालय (पिशोर), १४ वर्षे (मुले) : प्रथम : महात्मा फुले विद्यालय (पिशोर), द्वितीय : कर्मवीर काकासाहेब विद्यालय (कन्नड), १७ वर्षांखालील (मुले) : प्रथम : गुरुदयालसिंग आश्रमशाळा (गराडा), द्वितीय : सावित्रीबाई फुले कन्या विद्यालय (कन्नड), १९ वर्षांखालील (मुले) : प्रथम : डॉ. भीमराव आंबेडकर कनिष्ठ महाविद्यालय (कन्नड), द्वितीय : गुरुदयालसिंग आश्रमशाळा (गराडा), १६ वर्षांखालील (मुले) : प्रथम : छत्रपती विद्यालय (बनशेंद्रा).

खो-खो स्पर्धासाठी राकेश निकम, कडुबा चव्हाण, राजेंद्र पवार, मुक्तानंद गोस्वामी, विजय बारवाल, शाम खोसरे, जगदीश चव्हाण, डी. झेड. राठोड, के. व्ही. नवले यांनी पंच म्हणून काम पाहिले, अशी माहिती संयोजक प्रा. डब्ल्यू. के. चव्हाण व क्रीडा मार्गदर्शक अविनाश काळे यांनी दिली.

दैनिक
# दिव्य मराठी
दैनिक भास्कर समूहाचे मराठी वृत्तपत्र

वरचद . १० मंगळवार औरंगाबाद २७ ऑगस्ट २०१३ वाढदिव



दृष्टिक्षेप

## कन्नडला तालुकास्तरीय मॅरेथॉन स्पर्धा

**कन्नड** | हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिन व राष्ट्रीय क्रीडादिनानिमित्त कन्नड तालुका क्रीडा संघटना व शिवाजी महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने २९ ऑगस्ट रोजी तालुकास्तरीय मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेला सकाळी ८ वाजता क्रीडा संकुल येथून सुरुवात होणार आहे. या स्पर्धेत १७ वर्षांखालील मुलामुलींना सहभागी होता येईल. स्पर्धेचा मार्ग क्रीडा संकुलापासून हिवरखेडा गावापर्यंत व तेथून परत शिवाजी महाविद्यालयापर्यंत असणार आहे. या ठिकाणी समारोप होईल. याप्रसंगी विजेत्यांना बक्षीस देण्यात येईल. स्पर्धेत तालुक्यातील सर्व शाळांतील जास्तीत जास्त खेळाडूंनी सहभागी होण्याचे आवाहन प्राचार्य डॉ. व्ही. एन. भोसले व कन्नड तालुका क्रीडा संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी प्रा. वामनराव चव्हाण, डॉ. उदय डोंगरे, मुक्तानंद गोस्वामी, विजय बारवाल, अविनाश काळे, राकेश निकम, श्याम खोसरे, प्रवीण शिंदे, जगदीश नाचन यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

सकाळ शुक्रवार, ३० ऑगस्ट २०१३

औरंगाबाद TODAY




कन्नड : राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त आयोजित मॅरेथॉन स्पर्धेत सहभागी झालेले विद्यार्थी. (छायाचित्र : शर्मा)

# कन्नडला तालुकास्तरीय मॅरेथॉन स्पर्धा

## सरिता खरे, दादेश राठोड प्रथम

**कन्नड, ता. २९ (बातमीदार) :** राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त शिवाजी महाविद्यालय, तालुका क्रीडा व शारीरिक शिक्षक संघातर्फे गुरुवारी (ता. २९) तालुकास्तरीय मॅरेथॉन स्पर्धा झाल्या.

क्रीडा संकुलात पोलिस उपअधीक्षक शैलेश बलकवडे यांनी हिरवा झेंडा दाखवून स्पर्धेला सुरवात केली. शिवाजी महाविद्यालयात समारोप झाला. विद्यार्थ्यांना स्मृतिचिन्ह व प्रशस्तिपत्र देऊन गौरविण्यात आले. नगराध्यक्ष संतोष कोल्हे, पोलिस निरीक्षक खुशाल शिंदे, संस्थेचे संचालक अन्वर खान, प्राचार्य डॉ. विजय भोसले यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. सदाशिव पाटील, डॉ. उदय डोंगरे, प्रा. वामन चव्हाण, मुक्तानंद गोस्वामी, विजय बारवाल, प्रवीण शिंदे, श्याम खोसरे, डी. झेड. राठोड, संजय साळुंके, जगदीश चव्हाण, श्री. शेख, श्री. भालकर, राजेंद्र पवार, राकेश निकम, अविनाश काळे, प्रा. के. एल. भानुसे, प्रा. हुकूमचंद पवार, प्रा. व्ही. के. देशमुख, प्रा. अलका गडकरी, प्रा. सीमा काशीद उपस्थित होते.

### बहिरगावच्या मुलींची बाजी

मुलींमधून प्रथम सरिता मच्छिंद्र खरे (जिल्हा परिषद शाळा, बहिरगाव), द्वितीय स्वाती बबन पवार (बहिरगाव), तृतीय अरुणा पवार (सानेगुरुजी विद्यालय, कन्नड), उत्तेजनार्थ श्वेता आमले व प्रियंका चव्हाण (सावित्रीबाई फुले कन्या विद्यालय, कन्नड). मुलांमधून प्रथम दादेश राठोड, द्वितीय विश्वनाथ परदेशी (दोघे गुरुदयाल आश्रमशाळा, गराडा), तृतीय वाजेद कुरेशी, उत्तेजनार्थ मनोज ताजणे (दोघे महात्मा फुले विद्यालय, करंजखेडा), योगेश पवार (गराडा).

लोकमत
औरंगाबाद, शुक्रवार, दि. ३० ऑगस्ट २०१३

# मॅरेथॉन स्पर्धेत ११०० मुला-मुलींचा सहभाग



**कन्नड :** राष्ट्रीय क्रीडादिनानिमित्त शिवाजी महाविद्यालय कन्नड व तालुका क्रीडा शारीरिक शिक्षक महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तालुकास्तरीय मॅरेथॉन स्पर्धा गुरुवारी सकाळी उत्साहात पार पडली. क्रीडा संकुल ते हिवरखेडा गाव परत शिवाजी महाविद्यालय कन्नड या अंतरात ही स्पर्धा झाली.

स्पर्धेचे उद्घाटन उपविभागीय पोलीस अधिकारी शैलेश बलकवडे यांनी झेंडा दाखवून केले. नगराध्यक्ष संतोष कोल्हे, माजी नगरसेवक सदाशिव पाटील, शिवछत्रपती पुरस्कार विजेते डॉ. उदय डोंगरे, प्रा. वामन चव्हाण, संघटनेचे अध्यक्ष मुक्तानंद गोस्वामी, सचिव विजय बारवाल, प्रवीण शिंदे, श्याम खोसरे, डी. झेड, राठोड, जगदीश चव्हाण, शेख गयास, एम.आर. भालकर, राजेंद्र पवार, राकेश निकम आदी उपस्थित होते.

मुलांच्या स्पर्धेत गुरुदयालसिंग राठोड आश्रमशाळा गराडा शाळेच्या दादेश राठोड (प्रथम), याच शाळेचा विश्वनाथ परदेशी (द्वितीय), महात्मा फुले विद्यालय, करंजखेडा शाळेचा वाजेद कुरेशी (तृतीय) यांनी यश मिळविले, तर महात्मा फुले विद्यालयाचा मनोज ताजणे, गुरुदयालसिंग राठोड आश्रम शाळेचा योगेश पवार हे उत्तेजनार्थ बक्षिसाचे मानकरी ठरले. मुलींमध्ये जि.प. प्रशाला बहिरगावची सरीता खरे (प्रंथम), याच शाळेची स्वाती पवार (द्वितीय) व साने गुरुजी विद्यालय कन्नडची अरुणा पवार (तृतीय), तर सावित्रीबाई फुले कन्या विद्यालय कन्नडची श्वेता आमले व याच विद्यालयाची प्रियंका चव्हाण उत्तेजनार्थ बक्षिसाच्या मानकरी ठरल्या. स्पर्धेतील विजयी खेळाडूंना पोलीस निरीक्षक खुशाल शिंदे, शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय भोसले, मंडळाचे सदस्य अन्नवरखाँ यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन खेळाडूंचा सन्मान करण्यात आला. या स्पर्धेत तालुक्यातील विविध शाळांमधील अकराशे मुला-मुलींनी भाग घेतला. प्रास्ताविक डॉ. उदय डोंगरे, सूत्रसंचालन डॉ. रामचंद्र झाडे यांनी केले, तर मुक्तानंद गोस्वामी यांनी आभार मानले. (वार्ताहर)

दिव्य मराठी
औरंगाबाद
औरंगाबाद शुक्रवार, ३० ऑगस्ट २०१३

# मॅरेथॉन स्पर्धा उत्साहात

**कन्नड** । राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त शिवाजी महाविद्यालय व कन्नड तालुका क्रीडा तसेच शारीरिक शिक्षक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तालुकास्तरीय मॅरेथॉन स्पर्धा उत्साहात पार पडली. या स्पर्धेला पोलिस उपनिरीक्षक शैलेश बलकवडे यांनी क्रीडा संकुल येथून हिरवी झेंडी दाखवली. त्यानंतर स्पर्धेस सुरुवात झाली.

या स्पर्धेचा समारो शिवाजी महाविद्यालयात झाला. या स्पर्धेत मुलींमधून प्रथम सरिता खरे (जि. प. प्र. बहिरगाव), द्वितीय स्वाती पवार (जि. प. प्र. बहिरगाव), तृतीय अरुणा पवार (साने गुरुजी विद्यालय, कन्नड) उत्तेजनार्थ श्वेता आमले व प्रियंका चव्हाण (सावित्रीबाई फुले कन्या विद्यालय, कन्नड) तर मुलांमध्ये प्रथम दादेश राठोड (गुरुदयाल आश्रमशाळा, गराडा), द्वितीय विश्वनाथ परदेशी (गुरुदयाल आश्रमशाळा, गराडा), तृतीय वाजेद कुरेशी (महात्मा फुले विद्यालय, करंजखेडा) उत्तेजनार्थ मनोज ताजणे (महात्मा फुले विद्यालय, करंजखेडा) योगेश पवार (गुरुदयाल आश्रमशाळा, गराडा) या विद्यार्थ्यांनी बक्षिसे देण्यात आली.

या वेळी नगराध्यक्ष संतोष कोल्हे, खुशाल शिंदे आदी उपस्थित होते. स्पर्धेच्या यशस्वितेसाठी डॉ. सदाशिव पाटील, राजेंद्र पवार, प्रा.हुकूमचंद पवार, अविनाश काळे, राकेश निकम, जगदीश चव्हाण आदींनी परिश्रम घेतले.

# डॉ. वाघचौरे यांना चर्चासत्राचे निमंत्रण

**वैजापूर** । साहित्य अकादमी, दिल्ली यांच्या वतीने मुंबईत १३ सप्टेंबर रोजी प्रादेशिक भाषा साहित्य चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या चर्चासत्रात 'मराठी कथा निर्मिती प्रक्रिया' या विषयावर शोधनिबंध सादर करण्यासाठी येथील प्रसिद्ध साहित्यिक प्राचार्य डॉ. भीमराव वाघचौरे यांना निमंत्रित करण्यात आले आहे. डॉ. वाघचौरेंच्या चर्चासत्रातील सहभागाबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

२ औरंगाबाद शुक्रवार, ३० ऑगस्ट २०१३
पुण्य नगरी

# मॅरेथॉन स्पर्धेत अकराशे विद्यार्थी धावले

कन्नड/प्रतिनिधी

शहरात राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त शिवाजी महाविद्यालय व कन्नड तालुका क्रीडा व शारीरिक शिक्षक महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने तालुकास्तरीय मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत अकराशे विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सहभाग घेतला होता. ही स्पर्धा क्रीडा संकुल ते हिवरखेडा परत शिवाजी महाविद्यालयदरम्यान घेण्यात आली होती.

या स्पर्धेचे उद्घाटन उपविभागीय पोलीस अधीक्षक शैलेस बलकवडे यांच्या हस्ते झेंडा दाखवून करण्यात आले. या वेळी नगराध्यक्ष संतोष कोल्हे, माजी उपनगराध्यक्ष डॉ. सदाशिव पाटील, डॉ. उदय डोंगरे, प्रा. वामन चव्हाण, संघटनेचे अध्यक्ष मुक्तानंद गोस्वामी, विजय बारवाले, प्रवीण शिंदे, श्याम खोसरे, डी. झेड. राठोड, जगदीश चव्हाण, शे. गयास, राजेंद्र पवार आदींची उपस्थिती होती. या स्पर्धेत मुलांमध्ये दादादेश राठोड (गुरुदयाल आश्रमशाळा, गराडा) व मुलींमध्ये सरिता खरे (जि. प. प्र. बहिरगाव), द्वितीय - विश्वनाथ परदेशी, स्वाती पवार,



तृतीय - वाजेद कुरेशी, अरुणा पवार, उत्तेजनार्थ - मनोज ताजणे, योगेश पवार, श्वेता आमले, प्रियंका चव्हाण यांनी बाजी मारली.

या स्पर्धेसाठी डॉ. सदाशिव पाटील यांनी मोफत रुग्णवाहिका उपलब्ध करून दिली होती.

स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी अविनाश काळे, प्रा. के. एन. भानुसे, प्रा. गोराडे, प्रा. घोती, प्रा. बुरसे, प्रा. मगर, प्रा. आव्हाळे, प्रा. गायकवाड, प्रा. सीमा काशीद, प्रा. अलका गडकरी, प्रा. व्ही. के. देशमुख आदींनी परिश्रम घेतले तर विजयी खेळाडूंना पो. नि. खुशाल शिंदे, अन्वरमियाँ, प्रा. डॉ. विजय भोसले यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह व प्रशस्तिपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

शुक्रवार, दि २० सप्टेंबर २०१३ सामना

# आंतरमहाविद्यालयीन जिम्नॅस्टिक्स, मल्लखांब स्पर्धांना सुरुवात

संभाजीनगर, दि. १९ (क्री.प्र.) – येथील मराठवाडा सांस्कृतिक मंडळाच्या शारीरिक शिक्षण महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत आंतरमहाविद्यालयीन आर्टिस्टिक जिम्नॅस्टिक्स, रिदमिक जिम्नॅस्टिक्स, मल्लखांब व रोप मल्लखांब स्पर्धा उद्घाटन झाले. उद्घाटनाच्या कार्यक्रमाप्रसंगी अजितसिंह राठोड, वरिष्ठ प्रशिक्षक, साई हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

या स्पर्धेत २० महाविद्यालयातील ५० खेळाडूंनी सहभाग नोंदवला. आज झालेल्या स्पर्धांचा निकाल खालीलप्रमाणे : आर्टिस्टिक जिम्नॅस्टिक्स (मुली) : डिंपल ठाकरे (शासकीय कला व विज्ञान महाविद्यालय), अपूर्वा शेवतेकर (देवगिरी महाविद्यालय), गायत्री सराफ (देवगिरी महाविद्यालय), नंदिता जोशी (पी.ई.एस.शा.शि. महाविद्यालय), योगीता चंद (क्रीडा विभाग, डॉ. बा. आं. म. विद्यापीठ, आशा शिंदे (अंबेजोगाई, महाविद्यालय).

२) रिदमिक जिम्नॅस्टिक्स (मुली) : योगेश्वरी मिस्त्री (शिवाजी महाविद्यालय, कन्नड), आशा शिंदे (अंबेजोगाई महाविद्यालय), मल्लखांब (मुले), गौरव जोगदंड (स. भु. कला व वाणिज्य महाविद्यालय), रोहन श्रीरामवार (स.भु. कला व वाणिज्य महाविद्यालय), संदीप उंटवाल (स.भु. कला व वाणिज्य महाविद्यालय, प्रवीण शिंदे (म.सा.म.शा.शि. महाविद्यालय), राहुल श्रीरामवार (क्रीडा विभाग) डॉ. बा. आं. म. विद्यापीठ), रोप मल्लखांब (मुली), योगेश्वरी मिस्त्री (शिवाजी महाविद्यालय, कन्नड), गायत्री सराफ (शासकीय कला व विज्ञान महाविद्यालय).

सकाळ शनिवार, २१ सप्टेंबर २०१३

# कन्नड तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत चिखलठाण प्रशालेच्या विद्यार्थ्यांचे यश

## डॉ. आंबेडकर महाविद्यालयाचे मुला-मुलींचे संघ चमकले

कन्नड, ता. २० (बातमीदार) : तालुकास्तरीय शालेय व्हॉलीबॉल स्पर्धेत चिखलठाण येथील जिल्हा परिषद प्रशालेचा १४ वर्षांखालील संघ प्रथम, तर सावित्रीबाई फुले कन्या विद्यालयाचा संघ द्वितीय आला.

वृत्त

या स्पर्धेत १७ वर्षांखालील मुलांच्या गटात देवगाव रंगारीचे श्री गणेश विद्यालय प्रथम, तर चिखलठाण जिल्हा परिषद प्रशालेचा संघ द्वितीय आला. १९ वर्षांखालील गटात कन्नडच्या डॉ. भीमराव आंबेडकर कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुलांचा व मुलींचा हे दोन्ही संघ प्रथम आले. पायका गटात चिखलठाण प्रशालेचा मुलांचा व मुलींचा हे दोन्ही संघ प्रथम आले.

मैदानी क्रीडा प्रकारात १७ वर्षांखालील मुलांच्या गटात १०० मीटर धावणे स्पर्धेत सावित्रीबाई फुले कन्या विद्यालयाचा सूरज गोरे प्रथम, तर गराडा येथील गुरुदयालसिंग आश्रमशाळेचा दादेश नथ्थू राठोड प्रथम आला. १९ वर्षे खालील मुलांच्या गटात संदीप जाधव प्रथम आला. या शिवाय ४०० मीटर धावणे : गुरुदयालसिंग आश्रम शाळेचा योगेश पवार प्रथम, तर कन्नडच्या कर्मवीर काकासाहेब देशमुख विद्यालयाचा जीवन मुरलीधर काकडे द्वितीय. ८०० मीटर धावणे : गराडा येथील विश्वनाथ महादू परदेशी प्रथम, तर करंजखेड येथील वाजीद चाँद कुरेशी द्वितीय. अंधानेरचा समीर पठाण गोळाफेकमध्ये प्रथम, तर गराडा येथील राजेंद्र मोरे थाळीफेक मध्ये प्रथम आला, अशी माहिती क्रीडा संयोजक प्रा. डब्ल्यू. के. चव्हाण यांनी दिली.

तालुका क्रीडा अध्यक्ष मुक्तानंद गोस्वामी, विजय बारवाल, अविनाश काळे, राकेश निकम, शाम खोसरे, प्रवीण शिंदे, आर. टी. निकम, चंद्रशेखर शिंदे, धर्मेंद्र राठोड, जगदीश चव्हाण, श्रीमती रामटेके यांनी स्पर्धेचे संयोजन केले.

सोमवार, २३ सप्टेंबर २०१३

पुण्य नगरी

# तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत चिकलठाणच्या खेळाडूंची मुसंडी

कन्नड/प्रतिनिधी

येथील शिवाजी महाविद्यालयात झालेल्या तालुकास्तरीय स्पर्धेत चिकलठाण प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी करून व्हॉलिबॉल पायका स्पर्धेत जिल्हास्तरावर मुसंडी मारली.

यात १४ वर्षांखालील विजेता संघ अल्ताफ शहा (क), प्रवीण बोरसे, विशाल म्हस्के, आकाश आधाने, स्वप्नील गायकवाड, पवन म्हस्के, अनिल चव्हाण, आकाश चव्हाण, गणेश कुल्हाळ, अनिकेत दांडेकर, शुभम जयतमल, मयूर जाधव, १४ वर्षांखालील मुलांचा विजेता संघ - जयश्री जाधव, सुचिता चव्हाण, अश्विनी भट्टे, प्रगती चव्हाण, मोनिका मराठे, गीतांजली चव्हाण, प्रियंका चव्हाण, पूजा भोसले, कोमल चव्हाण (क), शीतल बोरसे, सुलताना शेख, मंदा ठोके, पूजा पवार, शुभांगी चव्हाण, १६ वर्षांखालील पायका (मुले) विजेता संघ - विशाल दांडेकर, प्रवीण चव्हाण, दीपक घोरपडे, पवन क्षीरसागर, शाहरुख शाह, गणेश चव्हाण, फारूक शाह, प्रथमेश दाभाडे, अल्ताफ शाह, प्रवीण बोरसे, १६ वर्षांखालील मुलींचा विजेता संघ - सुलताना शेख, शीतल बोरसे,



कल्याणी चव्हाण, नंदा ढोके, शुभांगी चव्हाण, पूजा पवार, भाग्यश्री जाधव, मोनिका मराठे, अश्विनी जट्टे, १७ वर्षांखालील मुलांचा उपविजेता संघ - विशाल दांडेकर, प्रवीण चव्हाण, दीपक घोरपडे, पवन क्षीरसगर, शाहरुख शाह, गणेश चव्हाण, फारुख शह, प्रथमेश दाभाडे, गणेश चव्हाण, नीलेश चव्हाण, वसंत चव्हाण या सर्व खेळाडूंनी चमकदार कामगिरी करून चिकलठाण प्रशालेचा बहुमान वाढविला असून या खेळाडूंना सहशिक्षक प्रवीण शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. या सर्वांचे ग्रामस्थ तसेच मुख्याध्यापक आर. एम. राठोड, ए. के. वसावे, रजनीकांत भदाणे, पी. यू. पारदी, एल. आर. राठोड, भरत खोसले, रायसिंग वडिले, मीना शिंदे, रेणुका कुलकर्णी, पाटील मॅडम, प्रमोद सूर्यवंशी, रवि वाघ आदींनी अभिनंदन केले आहे.

औरंगाबाद । सोमवार, ३० सप्टेंबर २०१३ । किंमत ₹ चार

सकाळ

## राज्यस्तरीय धावणे स्पर्धेत बळिराम राठोड तृतीय



कन्नड, ता. २९ (बातमीदार) : शहरातील शिवाजी महाविद्यालय येथील एनसीसी छात्र बळिराम पांडुरंग राठोड याने आठशे मीटर धावणे स्पर्धेत महाराष्ट्रातून तृतीय क्रमांक पटकावला.

आपल्या राष्ट्रात क्रीडा संस्कृतीचा विकास व्हावा यासाठी या वर्षापासून राष्ट्रीय छात्र सेना महानिदेशालय नवी दिल्ली यांनी एन. सी. सी.च्या इतर उपक्रमांबरोबर क्रीडा उपक्रमही सुरू केले. औरंगाबाद येथे संपन्न झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धेत श्री. राठोड तृतीय आले असून १४ ऑक्टोबर ते २३ ऑक्टोबर यादरम्यान दिल्ली येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेत ते सहभागी होणार आहेत. त्यांच्या निवडीबद्दल संस्थेचे अध्यक्ष मानसिंह पवार, डॉ. डी. डी. शिंदे, अशोकराव आहेर, ब्रिगेडिअर एस. जे. ठोंबरे, कर्नल श्री. चतुर्वेदी, प्रा. डॉ. विजय भोसले आदींनी अभिनंदन केले आहे.

लोकमत

लोकमत औरंगाबाद, मंगळवार, दि. १५ ऑक्टोबर २०१३ ३

# कन्नड येथे शालेय थ्रोबॉल स्पर्धा आज सुरु होणार

**कन्नड** : औरंगाबाद जिल्हा क्रीडा कार्यालय व दौलतरत्न क्रीडा मंडळ यांच्यावतीने आयोजित विभागीय शालेय थ्रोबॉल स्पर्धेचा प्रारंभ मंगळवारी सकाळी ९ वाजता शिवाजी महाविद्यालय कन्नड येथे होणार आहे.

विभागीय क्रीडा कार्यालय औरंगाबादचे उपसंचालक चंद्रकांत कांबळे यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्‌घाटन होणार आहे, तर दौलतरत्न क्रीडा मंडळाचे संस्थापक अध्यक्ष दौलतराव शिंदे अध्यक्षस्थानी राहतील. जिल्हा क्रीडा अधिकारी ऊर्मिला मोराळे, शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय भोसले, तालुका क्रीडा अधिकारी दिलीप खिल्लारे, क्रीडा अधिकारी शेख साजीद, राजकुमार भारुका, क्रीडा अधिकारी चंद्रशेखर घुगे, माजी उपसभापती शेकनाथ चव्हाण, शिवाजी महाविद्यालयातील क्रीडा विभागप्रमुख डॉ. उदय डोंगरे, क्रीडा संयोजक वामनराव चव्हाण, माजी कुस्तीपटू फुलसिंग बारवाल व जि.प. प्रशाला चिकलठाणचे मुख्याध्यापक रामेश्वर राठोड यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती राहील, असे निमंत्रक कन्नड तालुका शारीरिक शिक्षक संघटना यांनी कळविले आहे.

सकाळ बुधवार, १६ ऑक्टोबर २०१३

# थ्रोबॉल स्पर्धेत टेंडर केअर होम मुलींचा संघ प्रथम

## कन्नड येथे विभागीय स्पर्धेचे उद्‌घाटन, ४२ संघांचा सहभाग

### क्रीडावृत्त...

**कन्नड, ता. १५ (बातमीदार)** : जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व कन्नडच्या दौलतरत्न क्रीडा मंडळातर्फे आयोजित विभागीय थ्रोबॉल स्पर्धा शिवाजी महाविद्यालय येथे थाटात सुरू झाल्या. पहिल्याच दिवशी स्पर्धेत १४ वर्षे वयोगटात टेंडर केअर होम, औरंगाबाद येथील संघ प्रथम ठरला.



कन्नड : विभागीय शालेय थ्रोबॉल स्पर्धेचे उद्‌घाटन करताना क्रीडा उपसंचालक चंद्रकांत कांबळे. ऊर्मिला मोराळे, दौलत शिंदे, प्राचार्य विजय भोसले, डॉ. उदय डोंगरे, प्रवीण शिंदे, मुक्तानंद गोस्वामी.

स्पर्धेचे उद्‌घाटन क्रीडा उपसंचालक चंद्रकांत कांबळे यांच्या हस्ते झाले. अध्यक्ष दौलतराव शिंदे होते तर जिल्हा क्रीडा अधिकारी ऊर्मिला मोराळे, क्रीडा अधिकारी शेख साजेद, चंद्रशेखर घुगे, राजकुमार भारुका, प्राचार्य डॉ. विजय भोसले, फुलसिंग बारवाल यांची प्रमुख उपस्थिती होती.

स्पर्धेसाठी विभागातून परभणी, हिंगोली, बीड, औरंगाबाद, जालना येथून ४२ संघांचा सहभाग आहे. उर्वरित स्पर्धा गुरुवारी (ता. १६) होणार आहेत. पंच म्हणून प्रदीप बोरसे, राकेश खैरनार, संदीप जगताप, दिनेश वंजारे, मोहन शिंदे; नितीन कांबळे, नीलेश लांडगे, स्वरूप घुले, इम्रान खान आदी उपस्थित होते. स्पर्धेसाठी डॉ. उदय डोंगरे, प्रवीण शिंदे, मुक्तानंद गोस्वामी, विजयसिंग बारवाल, श्याम खोसरे, जगदीश चव्हाण, कैलास माने, श्याम शिंदे, सुरेश काळे, विश्वास पाटील यांनी पुढाकार घेतला.

बुधवार, १६ ऑक्टोबर २०१३
दैनिक दिव्य मराठी

# कन्नड येथे विभागीय थ्रो बॉल स्पर्धेस प्रारंभ



कन्नड | जिल्हा अधिकारी कार्यालय व दौलतरत्न क्रीडा मंडळाच्या विभागीय थ्रो बॉल स्पर्धेस शिवाजी महाविद्यालय येथे प्रारंभ झाला. स्पर्धेचे उद्घाटन क्रीडा उपसंचालक चंद्रकांत कांबळे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दौलतराव शिंदे यांची, तर जिल्हा क्रीडा अधिकारी ऊर्मिला मोराळे, क्रीडा अधिकारी शेख साजिद, चंद्रशेखर घुगे, राजकुमार भारुका, प्रा.विजय भोसले, फुलसिंग बारवाल यांची प्रमुख उपस्थिती होती.

स्पर्धेसाठी विभागातून परभणी, हिंगोली, बीड, औरंगाबाद, जालना येथून ४२ संघ सहभागी झाले आहेत. मंगळवारी झालेल्या स्पर्धेत १४ वर्षे वयोगटात औरंगाबाद येथील टेंडर केअर होमच्या संघाने प्रथम क्रमांक पटकावला. उर्वरित स्पर्धा आज १६ ऑक्टोबर रोजी होणार आहेत. पंच म्हणून प्रदीप बोरसे, राकेश खैरनार, संदीप जगताप, दिनेश वंजारे, मोहन शिंदे, नितीन कांबळे, नीलेश लांडगे, स्वरूप घुले, इम्रान खान आदींची उपस्थिती होती. स्पर्धेसाठी डॉ. उदय डोंगरे, प्रवीण शिंदे, मुक्तानंद गोस्वामी, विजयसिंग बारवाल, श्याम खोसरे, जगदीश चव्हाण, कैलास माने, श्याम शिंदे, सुरेश [illegible] विश्वास पाटील यांनी पुढाकार [illegible]

22

बुधवार, दि. १६ ऑक्टोबर २०१३ औंठ । सामना

# विभागीय शालेय थ्रोबॉल स्पर्धेचे उद्घाटन

संभाजीनगर, दि. १५ (क्री.प्र.) - कै. राधाबाई कुलकर्णी यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ जिल्हाधिकारी कार्यालय व दौलतरत्न क्रीडामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने विभागीय थ्रोबॉल स्पर्धेला उत्साहात सुरुवात झाली. या स्पर्धेचे उद्घाटन क्रीडा उपसंचालक चंद्रकांत कांबळे यांच्या हस्ते झाले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष दौलतरत्न क्रीडा मंडळाचे अध्यक्ष दौलतराव शिंदे होते. यावेळी जिल्हाधिकारी माराळे क्रीडा अधिकारी शेख साजेद, चंद्रशेखर घुगे, राजकुमार भारुका, प्रा. डॉ. विजय भोसले, फुलसिंग बारवाल आदी उपस्थित होते. या स्पर्धेसाठी पंच म्हणून प्रदीप बोरसे, राकेश खैरनार, संदीप जगताप, दिनेश वंजारे, मोहन शिंदे, नितीन कांबळे, नितेश लांडगे, गणेश बेद्दे, स्वरूप घुले, इम्रान खान यांनी काम पाहिले.ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्रवीण शिंदे, डॉ. उदय डोंगरे, मुक्तानंद गोस्वामी, विजयसिंग बारवाल, श्याम खोसरे, जगदीश चव्हाण, कैलास माने, श्याम शिंदे, सुरेश काळे, विश्वास पाटील यांनी परिश्रम घेतले.



*संभाजीनगर : कन्नड येथे आयोजित विभागीय थ्रो बॉल स्पर्धेचे उद्घाटन करताना क्रीडा उपसंचालक चंद्रकांत कांबळे, प्रवीण शिंदे आदी. विविध वयोगटात झालेल्या या स्पर्धेत संभाजीनगर आणि परभणी संघांनी मंगळवारी अंतिम फेरी गाठली.*

**विभागीय थ्रोबॉल स्पर्धेचा अंतिम फेरीचे सामने पुढीलप्रमाणे : १४ वर्षे ( मुले ) - परभणी - संभाजीनगर शहर, १४ वर्षे ( मुली ) - परभणी शहर - संभाजीनगर ग्रामीण १७ वर्षे ( मुले ) - संभाजीनगर शहर - परभणी शहर, १७ वर्षे ( मुली ) - संभाजीनगर शहर - परभणी शहर,१९ वर्षे ( मुले ) - संभाजीनगर शहर - परभणी शहर१९ वर्षे ( मुली ) - संभाजीनगर शहर - परभणी शहर, या संघांनी अंतिम फेरीत धडक मारली.**

सकाळ
औरंगाबाद, मंगळवार,
२१ जानेवारी २०१४

# प्रतिकूल परिस्थितीतही स्नेहाने मिळविले यश

## कन्नडच्या शिवाजी महाविद्यालयाची 'शिवछत्रपती पुरस्कार'प्राप्त पहिलीच विद्यार्थिनी



स्नेहा ढेपे

कन्नड, ता. २० (बातमीदार) : येथील शिवाजी महाविद्यालयाची विद्यार्थिनी स्नेहा पुंजाराम ढेपे हिला राज्य शासनाचा मानाचा शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार सोमवारी (ता. २०) जाहीर झाला असून, कन्नडसारख्या ग्रामीण भागातून हा पुरस्कार मिळविणारी ही पहिलीच विद्यार्थिनी ठरली. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत तिने यश संपादन केले.

शिवाजी महाविद्यालयात एम.ए. द्वितीय वर्षात शिक्षण घेणाऱ्या स्नेहा ढेपे हिने तलवारबाजीतील 'सेबर' या क्रीडा प्रकारात यापूर्वी अनेक पुरस्कार मिळविले. क्रीडा क्षेत्रात मानाचा समजला जाणारा शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार स्नेहाला मिळाल्याने ग्रामीण भागातील विद्यार्थिनींच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. २००७-०८ मध्ये स्नेहाला जिल्हा क्रीडा पुरस्कार मिळाला. यानंतर तिने राज्य व राष्ट्रीय स्तरावरील अनेक स्पर्धांत भाग घेत चमकदार कामगिरी करून वेगळा ठसा उमटविला.

### स्नेहाला मिळालेले पुरस्कार

- २००७-०८ : जिल्हा क्रीडा पुरस्कार.
- २०११-१२ : रांची (झारखंड) येथील राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत कास्यपदक.
- राज्य शासनातर्फे एक लाख रुपये देऊन सन्मानित.
- राज्यस्तरीय १८ स्पर्धांत सहभाग, ११ सुवर्ण, ९ रौप्य व ५ कास्यपदके प्राप्त.
- राष्ट्रीय स्तरावरील १५ स्पर्धांत सहभाग, १ रौप्य व ५ कास्यपदके पटकाविली.

### ग्रामीण भागातील मुलींना मार्गदर्शन करणार

ग्रामीण भागातील मुलींना क्रीडा क्षेत्रात मार्गदर्शन करण्याचा मानस असल्याचे स्नेहाने सांगितले. ती म्हणाली, की सहावीपासूनच मला या क्रीडा प्रकाराची आवड निर्माण झाली. औरंगाबादेतील सुशीलादेवी देशमुख विद्यालयातील प्रा. छाया पानसे यांनी मोलाचे सहकार्य केले.

पुढे शिवाजी महाविद्यालयात प्रवेश घेतल्यावर डॉ. उदय डोंगरे व प्राचार्य डॉ. विजय भोसले; तसेच नाशिक येथील अशोक दुधाटे यांनी मार्गदर्शन केले.

मध्यमवर्गीय कुटुंब असूनही वडील पुंजाराम ढेपे व आई बेबीनंदा ढेपे यांनी मला खेळण्यास प्रोत्साहन दिले.

ऐपत नसताना वेळोवेळी होणारा मोठा खर्च उचलला. अनेक अडचणींवर मात करीत मिळालेल्या यशामुळे आनंद वाटतो.

न वर्षांचे थकीत पुरस्कार जाहीर ■ फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात होणार वितरण सोहळा

# छत्रपती क्रीडा पुरस्कारांना मुहूर्त सापडला

- एकदाचे शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार जाहीर झाले.
ना लटकवून ठेवल्यानंतर राज्याच्या क्रीडा विभागाला राज्य
ण्याची सुबुद्धी सुचली आहे आणि फेब्रुवारीच्या पहिल्या
खेळाडू-संघटकांना हे पुरस्कार सन्मानाने देण्यात येणार
ज्याचे क्रीडा मंत्री पद्माकर वळवी यांनी सांगितले.

## मराठवाड्यातील छत्रपती पुरस्कार विजेते खेळाडू



थोरात  चंद्रजित जाधव  कार्तिकी शिरडकर  रोहिणी आवारे  मंगल पांडे  सिद्धार्थ कदम

विजेत्या खेळाडूंची
फायलींमध्ये दाबून
ने चालवला होता.
वळ क्रीडापटूंचाच
त छत्रपती शिवाजी
केला जात होता.
हीर खोदण्यासाठी
ारच्या लटकवून
्यातील खेळाडूंना
करण्याचा प्रकार
ान यापुढे वेळेवर
सोहळा शिवजयंती
पेक्षा क्रीडापटू आणि
आहे. पण यंदाच्या
ंतीचा मुहूर्त साधता
ाकडून आधीच स्पष्ट

रस्कार नाही
संघ राष्ट्रीय स्पर्धेत
करण्यात अपयशी

समोर आल्या आहेत. जलतरणात तपनकुमार पाणिग्रही यांना २००९-१० सालासाठी उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शकाचा पुरस्कार देण्यात आला आहे तर याच खेळात २०१०-११ सालासाठी त्यांची कन्या अनन्या पाणिग्रहीला शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. याचाच अर्थ एकाच कार्यक्रमात पिता-पुत्री सन्मानित होतील.

### क्रिकेटमध्ये एकही खेळाडू पात्र नाही

हिंदुस्थानातील सर्वात लोकप्रिय असलेल्या क्रिकेटच्या एकाही खेळाडूला राज्याचा क्रीडा पुरस्कार मिळू शकलेला नाही. एकाही क्रिकेटपटूचे नाव नसल्यामुळे क्रीडा विभागाला याची विचारणा केल्यास त्यांच्याकडून योग्य माहिती मिळू शकली नाही तर मुंबई क्रिकेट संघटनेलाही या पुरस्कारांबाबत फारशी उत्सुकता नसल्याचे दिसले.

### कार्यकर्त्यांच्या पुरस्कारामध्ये ठाणेच

ठाणे

संघटक आणि कार्यकर्त्यांचे पुरस्कार जाहीर झाले खरे, पण मुंबई



### उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार

वर्ष २००९-१० : तपनकुमार पाणीग्रही (जलतरण), अशोक कोंडाजी दुधारे (तलवारबाजी), चंद्रजीत भालचंद्र जाधव (खो-खो). वर्ष २०१०-११ : सुबोध अनंत डंके (जलतरण), अशोक शि. गुंजाळ (स्केटिंग), नरेंद्र विठ्ठल कुंदर (खो-खो). वर्ष २०११-१२ : वर्षा म. उपाध्ये (जिम्नॅस्टिक), काकासाहेब किसन पवार (कुस्ती), राजीव प्र. मराठे (खो-खो).

### जिजामाता राज्य क्रीडा पुरस्कार

वर्ष २००९-१० : कविता माणिकराव निंबाळकर (नावंदे), पुणे, वर्ष २००१०-११ : मधु वीरेंद्र भांडारकर (मुंबई). वर्ष २०११-१२ : सिमरन सतीश गायकवाड (ठाणे), वर्ष २०११-१२ : कल्पना तेंडुलकर (सिंधुदुर्ग), (संघटक/कार्यकर्ती प्रवर्गातून) (या प्रवर्गामधून सन २००९-१० व सन २०१०-११ या वर्षाकरिता कोणीही पात्र उमेदवार आढळले नाहीत.)

### शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (खेळाडू)

वर्ष २००९-१० : आट्यापाट्या : अलोक पांडे, तलवारबाजी : स्नेहा ढेपे, अजिंक्य दुधारे, जिम्नॅस्टिक्स : पूजा सुर्वे, संदेश अतकरी, जिम्नॅस्टिक्स : वंदिता रावल, हॅण्डबॉल : गायत्री कांबळे, ज्युदो : सुरेखा शिरसाट - आव्हाड, खो-खो : सुजाता शानमे, शंतनू

गोचडे, स्केटिंग : निखिलेश ताभाणे.

वर्ष २०१०-११ : पॉवरलिफ्टिंग : दीपाली जालगावकर, मल्लखांब : आरती साकोरे, राजेश अमराळे, जिम्नॅस्टिक्स : सदिच्छा कुलकर्णी (थेट पुरस्कार), ज्योती शिंदे, मोहन बामणे, तायक्वांदो : पूर्वा दीक्षित (थेट पुरस्कार), वर्षा लांडगे, महेंद्र कांतीलाल गोकुळे, ज्युदो : किरण पेठे, तुषार माळोदे, रोईंग : अमर पाटील, नेमबाजी : आयोनिका पॉल, मिर्या शहजाद इशरत,

कबड्डी : स्नेहल साळुंखे, जितेश जोशी, खो-खो : रोहिणी आवारे, आट्यापाट्या : स्वाती नंदागवळी, भूषण गोमासे, कुस्ती : उमेश हणमंत सुळ, जलतरण : ज्योत्स्ना पानसरे, अजय निशिकांत मोघे, ॲथलॅटिक्स : कृष्णकुमार राणे, वुशू : शांती राठोड, संदीप शेलार, हॅण्डबॉल : कीर्ती मुदलियार, टेबल टेनिस : आश्लेषा बोडस, हॉकी : धनंजय महाडिक (थेट पुरस्कार), याटिंग : कमांडर सिन्हा (थेट पुरस्कार), तृणाल हेलेगावकर (थेट पुरस्कार).

वर्ष २०११-१२ :

तिरंदाजी : जयलक्ष्मी सारीकोंडा, आट्यापाट्या : पंकज पराते, बॅडमिंटन : इशांत नक्वी, शरीरसौष्ठव : संग्राम बबर चौगुले, कॅरम : प्रकाश गायकवाड, तलवारबाजी : स्नेहल विधाते, वुशू : प्रतीक्षा शिंदे, सोपान कटके, कुस्ती : शरद पवार, जिम्नॅस्टिक्स : कार्तिकी शिरोडकर (थेट पुरस्कार), क्षिप्रा जोशी (थेट पुरस्कार), जयश्री प्रिंदावणेकर, आनंद थोरात (थेट पुरस्कार), सिद्धार्थ कदम (थेट पुरस्कार),



### लांडगे, बाम यांना जीवनगौरव

■ क्रीडा मानसोपचारतज्ज्ञ भीष्मराज बाम यांना २०११-१२ सालच्या 'क्रीडा जीवनगौरव पुरस्कार' जाहीर करण्यात आला आहे. तसेच बाळासाहेब लांडगे (२००९-१०) आणि अटल बहादूर सिंग (२०१०-११) यांनाही हे प्रतिष्ठेचे सर्वोच्च राज्य क्रीडा पुरस्कार जाहीर झाले आहेत.

: सुवर्णा बारटक्के, ॲथलेटिक्स : रेश्मा पाटील.

### एकलव्य राज्य क्रीडा पुरस्कार (अपंग खेळाडू)

वर्ष २००९-१० : दिनेश बालगोपाल, दीपा मलिक. वर्ष २०१०-११ : कांचन चौधरी, वर्ष २०११-१२ : संदीप गवई, महानंदा तळवेकर.

### शिवछत्रपती राज्य साहसी क्रीडा पुरस्कार

वर्ष २००९-१० : स्वप्नाली यादव (मुंबई), समुद्र-खाडी पोहणे, वर्ष २०१०-११ : संजय टकले (पुणे) मोटोक्रॉस, वर्ष २०११-१२ : आप्पासाहेब भीमराज ढुस (अहमदनगर) पॅराजंपिंग.

### शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (संघटक/ कार्यकर्ते)

वर्ष २००९-१० : सुरेश पाटील, ठाणे, (मुंबई विभाग), राजीव कुलकर्णी, पुणे (पुणे विभाग), उत्तम इंगळे, परभणी (संभाजीनगर विभाग), संजय लोखंडे, नागपूर (नागपूर विभाग), आनंद खरे, नाशिक (नाशिक विभाग)

वर्ष २०१०-११ : प्रकाश पवार, ठाणे (मुंबई विभाग), संजय भोकरे, सांगली (कोल्हापूर विभाग), दिलीप घोडके, अहमदनगर (पुणे विभाग), हनुमंत लुंगे, अमरावती (अमरावती विभाग).

वर्ष २०११-१२ : अरविंद ठाणेकर, ठाणे (मुंबई

पुण्यनगरी
संमिश्र
औरंगाबाद, मंगळवार, २१ जानेवारी २०१४

# शिवछत्रपती पुरस्कारांची घोषणा

## क्रीडामंत्र्यांनी केले खेळाडूंचे अभिनंदन

**मुंबई :** शिवछत्रपती जीवनगौरव पुरस्कारासह राज्य क्रीडा पुरस्कारासाठी निवड करण्यात आलेल्या सन २००९-१०,१०-११ व ११-१२ या वर्षासाठीच्या खेळाडूंची व क्रीडा संघटकांची घोषणा क्रीडा व युवक कल्याणमंत्री ना.ॲड.पद्माकर वळवी यांनी केली.

राज्यातील ज्येष्ठ क्रीडापटू, क्रीडा मार्गदर्शक, क्रीडा संघटक-कार्यकर्ते व क्रीडा क्षेत्रातील संबंधित ज्या व्यक्तींनी खेळांसाठी आपले सर्वस्व अर्पण करून महाराष्ट्राच्या क्रीडा क्षेत्रात अतुलनीय यश संपादित केले,ज्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या क्रीडा कार्यकर्तृत्वाचा राज्याच्या क्रीडा जीवनावर संस्मरणीय प्रभाव पडला अशा क्रीडामहर्षींचा शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरव करण्यात येतो. त्यानुसार तीन ज्येष्ठ क्रीडामहर्षींची वरील तीन वर्षांच्या क्रीडा पुरस्कारांसाठी घोषणा करण्यात आल्याची माहिती ना.ॲड.पद्माकर वळवी यांनी दिली. छत्रपती राज्य क्रीडा जीवन पुरस्कार, उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शन पुरस्कार, जिजामाता राज्य क्रीडा पुरस्कार, छत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार(खेळाडू),एकलव्य राज्य क्रीडा पुरस्कार(अपंग खेळाडू),छत्रपती राज्य साहसी क्रीडा पुरस्कार,छत्रपती राज्य क्रीडा संघटक-कार्यकर्ते पुरस्कारप्राप्त व्यक्तींची नावे ना.वळवी यांनी घोषित केली. यात शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवनगौरव पुरस्कार सन २००९-१० साठी बाळासाहेब लांडगे(पुणे),सन २०१०-११ साठी अटल बहादूरसिंग(नागपूर),२०११-१२ साठी भीष्मराज बाम (नाशिक) यांची निवड करण्यात आली.

**भीष्मराज बाम, बहादुरसिंग, बाळासाहेब लांडगे यांना जीवनगौरव**

**काका पवार, दुधारेंसह नऊ जणांना उत्कृष्ट मार्गदर्शक पुरस्कार**



उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार २००९-१० साठी तपनकुमार पाणीग्रही(जलतरण),अशोक कोंडाजी दुधारे,चंद्रजित भालचंद्र जाधव (खो-खो),२०१०-११ साठी सुबोध अनंत डंके (जलतरण),अशोक गुंजाळ(स्केटिंग),नरेंद्र विठ्ठल कुंदर(खो-खो), २०११-१२ साठी वर्षा उपाध्ये(जिम्नॅस्टिक),काका साहेब किसन पवार (कुस्ती),राजीव प्र.मराठे(खो-खो),जिजामाता राज्य पुरस्कारासाठी २००९-१० कविता माणिकराव निंबाळकर (पुणे),२०१०-११ साठी मधु वीरेंद्र भांडारकर(मुंबई),२०११-१२ सिमरत सतीष गायकवाड(ठाणे),कल्पना तेंडुलकर(सिंधुदुर्ग), शिवछत्रपती राज्य पुरस्कार २००९-१० साठी आलोक चंद्रशेखर पांडे(आट्यापाट्या), स्नेहा पुंजाराम ढेपे,अजिंक्य अशोक दुधारे(तलवारबाजी),पूजा श्रीनिवास सुर्वे, संदेश ग्यानीराम अतकरील,वंदीता नीलेश रावल(जिम्नॅस्टिक),गायत्री ज्ञानेश्वर कांबळे (हॅण्डबॉल),सुरेखा भानुदास शिरसाठ आव्हाड (ज्युदो),सुजाता किशनराव शानमे,शंतनू श्रीरंग इनामदार(खो-खो),संगीता केशवराव देशमुख(कबड्डी),श्रेयसी विनय मनोहर,विक्रांत मुरलीधर दाभाडे(मल्लखांब),संजय प्रतापराव सरदेसाई(पॉवर (जलतरण),पूजा दत्तात्रय भालेकर(तायक्वांदो), मयूर किरण संदासने (वेटलिफ्टिंग),ज्ञानेश्वर व्यंकट गोचडे(कुस्ती),निखिलेश निरंजन ताभाने (स्केटिंग). २०१०-११ जळगावकर दीपाली राजेंद्र (पॉवर लिफ्टिंग),साकोरे आरती अप्पाजी,राजेश बबन अमराळे(मल्लखांब),सदिच्छा कुलकर्णी,ज्योती शिंदे,मोहन बामणे(जिम्नॅस्टिक),पूर्वा दीक्षित,वर्षा लांडगे,महेंद्र गोकुळे (तायक्वांदो),किरण पेठे,तुषार माळोदे(ज्युदो),अमर पाटील(रोईंग),आयोनिका पॉल,शहजाद मिर्झा(शूटिंग),स्नेहल साळुंके,जितेश जोशी (कबड्डी)रोहिणी आवारे (खो-खो),स्वाती नंदा गवळी,भूषण गोमासे(आट्यापाट्या),उमेश सूळ(कुस्ती),ज्योत्स्ना पानसरे,अजय मोघे(जलतरण),कृष्णकुमार राणे(ॲथलेटिक्स),शांती राठोड,संदीप शेलार(वुशू),कीर्ती मुरलीयार(हॅण्डबॉल),आश्लेषा बोडस(टेबल टेनिस),धनंजय महाडिक(हॉकी),कमांडर अतुल सिन्हा,तृणाल हेलेगावकर .२०११-१२ साठी जयलक्ष्मी सारीकोंडा (आर्चरी),पंकज परादे(आट्यापाट्या),ईशांत नकवी (बॅडमिंटन),संग्राम चौगुले (बॉडीबिल्डींग),प्रकाश गायकवाड(कॅरम),स्नेहल विधाते(तलवारबाजी),प्रतीक्षा शिंदे,सोपान कटके(वुशू),शरद पवार(कुस्ती),कार्तिकी शिरोडकर,आनंद थोरात,शिप्रा जोशी,सिद्धार्थ कदम,जयश्री पिंदावणोकर,विनाया सावंत(जिम्नॅस्टिक),अनन्या पाणीग्रही(जलतरण),नेहा सापते(शूटिंग),स्नेहांकिता वरुटे(पॉवर लिफ्टिंग),सायली धुरी,शशिधर म्हसकर(मल्लखांब),कीर्ती चव्हाण,मनोज वैद्य (खो-खो),कोमल वाघुळे(हॅण्डबॉल),सुवर्णा बारटक्के(कबड्डी),रेश्मा पाटील (ॲथलेटीक्स),एकलव्य राज्य क्रीडा पुरस्कारासाठी सन २००९-१० दिनेश बालगोपाल,मलिक दीपा.२०१०-११ कांचन चौधरी. २०११-१२ संदीप गवई,महानंदा तळवेकर,छत्रपती राज्य साहसी क्रीडा पुरस्कारासाठी २००९-१० स्वप्नाली यादव मुंबई(समुद्र/खाडी पोहणे),२०१०-११ संजय टकले पुणे(मोटोक्रॉस),२०११-१२ आप्पासाहेब ढूस, अहमदनगर(पॅरा जम्पिंग),शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार संघटक /कार्यकर्त्यांसाठी सन २००९-१० सुरेश पाटील, ठाणे, राजीव कुलकर्णी पुणे,उत्तम इंगळे परभणी, संजय लोखंडे, नागपूर, आनंद डॅनियल खरे नाशिक,२०१०-११ प्रकाश पवार, ठाणे, संजय भोकरे, सांगली, दिलीप रामसिंग घोडके,अहमदनगर, हनुमंत लुंगे,अमरावती,२०११-१२ अरविंद ठाणेकर, ठाणे, अशोक मगर,उस्मानाबाद, शहाजी सूर्यवंशी, कोल्हापूर, मंगल पांडे,औरंगाबाद, सदानंद जाधव,अमरावती व डॉ.बबन कायवाडे,नागपूर यांची निवड करण्यात आली आहे.सर्व पुरस्कारप्राप्त खेळाडू संघटक कार्यकर्त्यांचे

## लोकमतचे भाकीत खरे ठरले

# मराठवाड्यातील १४ जणांना शिवछत्रपती पुरस्कार जाहीर


काका पवार


मंगल पांडे


सिद्धार्थ कदम


कार्तिकी शिरोडकर


तेजस्विनी मुळे


आनंद थोरात


चंद्रजित जाधव


स्नेहा ढेपे


सुजाता शानमे


रोहिणी आव

जयंत कुलकर्णी • औरंगाबाद


११२ जण शिवछत्रपती पुरस्काराच्या रेसमध्ये

अर्जुन पुरस्कारप्राप्त काका पवारसह मराठवाड्यातील चौदा जणांचा समावेश

महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने सोमवारी २००९-१०, २०१०-११, २०११-१२ या वर्षीच्या जाहीर केलेल्या प्रतिष्ठेच्या शिवछत्रपती पुरस्काराचे मराठवाड्यातील १४ जण मानकरी ठरले आहेत. हे चौदाही खेळाडू हा मानाचा पुरस्कार मिळवण्याच्या शर्यतीत असल्याचे वृत्त लोकमतने गेल्या वर्षी ३० ऑगस्ट रोजी दिले होते.

लोकमतने दिलेल्या त्या वृत्तात औरंगाबादचे तेजस्विनी मुळे, जिम्नॅस्ट सिद्धार्थ कदम, आनंद थोरात, कार्तिकी शिरोडकर, स्नेहा ढेपे हे खेळाडू शिवछत्रपती पुरस्काराच्या शर्यतीत असल्याचे म्हटले होते. त्याचप्रमाणे औरंगाबादच्या या खेळाडूंशिवाय कबड्डीचे ज्येष्ठ संघटक परभणीचे मंगल पांडे, यू. डी. इंगळे (परभणी), खो-खोचे ज्येष्ठ संघटक चंद्रजित जाधव, खो-खो खेळाडू सुजाता शानमे, रोहिणी आवारे आणि अशोक मगर, मराठवाड्याची कुस्तीची शान समजला जाणारा अर्जुन पुरस्कारप्राप्त काका पवार, शरद पवार, ज्ञानेश्वर गोचडे (लातूर), कविता निंबाळकर (बीड) हेही शिवछत्रपती पुरस्काराच्या शर्यतीत असल्याचे त्या वृत्तात म्हटले होते. या सर्वांनाच आज शासनातर्फे प्रतिष्ठित असा शिवछत्रपती पुरस्कार जाहीर झाला. २०१० साली रांचीतील राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राला तलवारबाजी


कविता निंबाळकर


यु. डी. इंगळे


ज्ञानेश्वर गोचडे

खेळात कास्यपदक जिंकून देणाऱ्या स्नेहल ढेपेचाही या पुरस्कारासाठी राज्य तलवारबाजी संघटनेतर्फे प्रस्ताव पाठवण्यात होता. त... स्नेहल ढेपे पुरस्कारासा... पुरेसे असतानाही अहवाल मागवण्यात नव्हता. त्या वेळेस लोकमतने या पुढाकार घेऊन तिला न्यायही मि... दिला होता.

## शिवछत्रपती पुरस्कार विजेते

- काका पवार (मार्गदर्शक)
- चंद्रजित जाधव (मार्गदर्शक)
- मंगल पांडे (संघटक)
- यु. डी. इंगळे (संघटक)
- अशोक मगर (संघटक)
- कविता निंबाळकर (जिजामाता पुरस्कार)
- सिद्धार्थ कदम (जिम्नॅस्टिक)
- कार्तिकी शिरोडकर (जिम्नॅस्टिक)
- आनंद थोरात (जिम्नॅस्टिक)
- तेजस्विनी मुळे (नेमबाजी)
- रोहिणी आवारे (खो-खो)
- सुजाता शानमे (खो-खो)
- शरद पवार (कुस्ती)
- ज्ञानेश्वर गोचडे (कुस्ती)

लोकमत समाचार
औरंगाबाद, मंगलवार, 21 जनवरी 2014

# मराठवाड़ा के 14 को शिव छत्रपति पुरस्कार

**औरंगाबाद।** 20 जनवरी. (खेल संवाददता)

राज्य सरकार के शालेय शिक्षा और खेल विभाग ने सोमवार को वर्ष 2009-10, 2010-11, 2011-12 के लिए प्रतिष्ठित शिवछत्रपति पुरस्कार की घोषणा की. मराठवाड़ा के 14 लोगों को इस पुरस्कार के लिए चुना गया है.

जिन खिलाड़ियों को पुरस्कार घोषित किया है उनमें औरंगाबाद की तेजस्विनी मुले, जिम्नास्ट सिद्धार्थ कदम, आनंद थोरात, कार्तिकी शिरोड़कर, स्नेहा ढेपे शामिल हैं. इसके अलावा कबड्डी के वरिष्ठ संगठक परभणी के मंगल पांडे, यूडी इंगले (परभणी), खो-खो के वरिष्ठ संगठक चंद्रजीत जाधव, खो-खो खिलाड़ी सुजाता शानमे, रोहिणी आवारे, अशोक मगर, काका पवार, शरद पवार, ज्ञानेश्वर गोचड़े (लातूर), कविता निंबालकर (बीड) शामिल हैं. 2010 में रांची में खेली गई राष्ट्रीय खेल प्रतियोगिता में तलवारबाजी मुकाबले में महाराष्ट्र को कांस्य पदक दिलाने वाली स्नेहा ढेपे भी पुरस्कारों की सूची में शामिल है.



काका पवार, मंगल पांडे, सिद्धार्थ कदम, कार्तिकी शिरोड़कर, तेजस्विनी मुले, आनंद थोरात



चंद्रजीत जाधव, स्नेहा ढेपे, सुजाता शानमे, रोहिणी आवारे, कविता निंबालकर, यू. डी. इंगले, ज्ञानेश्वर गोचड़े

१२ लोकमत औरंगाबाद, गुरुवार, २३ जानेवारी २०१४

# पुरस्कार जाहीर झालेल्या खेळाडूंचा सत्कार



**औरंगाबाद** : महाराष्ट्र शासनातर्फे नुकताच प्रतिष्ठित शिवछत्रपती पुरस्कार जाहीर करण्यात आला. जाहीर झालेल्या पुरस्कार यादीत औरंगाबादचा सिद्धार्थ कदम, कार्तिकी शिरोडकर, आनंद थोरात (जिम्नॅस्टिक), स्नेहा ढेपे (तलवारबाजी) आणि तेजस्विनी मुळे (नेमबाजी) यांचाही समावेश आहे. या खेळाडूंचा गारखेडा परिसरातील विभागीय क्रीडा संकुलात सत्कार करण्यात आला.

हा सत्कार महाराष्ट्र कबड्डी संघटनेचे अध्यक्ष प्रा. किशोर पाटील आणि 'साई'च्या पश्चिम विभागीय केंद्राचे असिस्टंट डायरेक्टर वीरेंद्र भांडारकर यांच्या हस्ते झाला. या प्रसंगी मान्यवरांच्या हस्ते आधीचे शिवछत्रपती पुरस्कारप्राप्त दिनकर तेलंग, विजय पाथ्रीकर, वीरेंद्र भांडारकर, उदय डोंगरे, मकरंद जोशी, ऋतुपर्ण कुलकर्णी, अमेय जोशी यांचाही सत्कार करण्यात आला. तेजस्विनी मुळेच्या अनुपस्थितीत तिचे वडील मनोज मुळे यांनी हा सत्कार स्वीकारला.

या प्रसंगी वीरेंद्र भांडारकर आणि किशोर पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन जिल्हा क्रीडाधिकारी ऊर्मिला मोराळे यांनी केले. या सत्कार समारंभास क्रीडा उपसंचालक चंद्रकांत कांबळे यांच्यासह विविध क्रीडा संघटनांचे पंकज भारसाखळे, कमांडर विनोद नरवडे, कुलजितसिंग दरोगा, सुनील सुतवणे, सुरेश मिरकर, क्रीडाधिकारी गीता साखरे, माणिक राठोड, युवराज राठोड, बाबुराव कदम, दयानंद कांबळे, प्रभुलाल पटेल, दिनेश वंजारे, सुनील डावकर, सय्यद रियाज, विनोद माने, सुभाष मुरकुंडे, सुनील डावकर आदी उपस्थित होते. (क्रीडा प्रतिनिधी)

30

महाराष्ट्र टाइम्स
महाराष्ट्र टाइम्स, औरंगाबाद ■ गुरुवार, २३ जानेवारी २०१४



# शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेत्या खेळाडूंचा गौरव

**म. टा. प्रतिनिधी, औरंगाबाद**

क्रीडा उपसंचालक कार्यालयातर्फे राज्य शासनाने जाहीर केलेल्या शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारप्राप्त खेळाडूंचा गौरव करण्यात आला. विभागीय क्रीडा संकुलात हा सत्कार सोहळा झाला. तेजस्विनी मुळे (नेमबाजी), स्नेहा ढेपे (तलवारबाजी), कार्तिकी शिरडकर, सिद्धार्थ कदम, आनंद थोरात (सर्व जिम्नॅस्ट) या शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार जाहीर झालेल्या खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी साई क्रीडा प्रशिक्षण केंद्राचे सहायक संचालक वीरेंद्र भांडारकर, महाराष्ट्र राज्य कबड्डी संघटनेचे अध्यक्ष प्रा. किशोर पाटील, क्रीडा उपसंचालक चंद्रकांत कांबळे, जिल्हा क्रीडा अधिकारी ऊर्मिला मोराळे, नगरसेवक पंकज भारसाखळे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच डॉ. विजय पाथ्रीकर, डॉ. मकरंद जोशी, डॉ. उदय डोंगरे, ऋतुपर्ण कुलकर्णी हे शिवछत्रपतीप्राप्त खेळाडूही उपस्थित होते. कार्यक्रमास मनोज मुळे, बाबुराव अतकरे, सुभाष मुरकुंडे, सय्यद साजीद आदी उपस्थित होते.



कन्नड येथील शिवाजी महाविद्यालयात विद्यार्थी परिषदेचा शुभारंभ करताना योगेश्वरी मिस्त्री. सोबत राहुल खरे, प्राचार्य डॉ. विजय भोसले, संस्थेचे सचिव डॉ. निकम आदी.

# शिवाजी महाविद्यालयात विद्यार्थी परिषदेचा शुभारंभ

कन्नड : येथील शिवाजी महाविद्यालयात विद्यार्थी परिषदेचे उद्घाटन महाविद्यालयाची बी.ए. प्रथम वर्षाची विद्यार्थिनी आंतरराष्ट्रीय योगा खेळाडू योगेश्वरी मिस्त्री व टी.व्ही. कलाकार व याच महाविद्यालयात बी.ए. प्रथम वर्षाचा विद्यार्थी राहुल खरे यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव डॉ. पी.के. निकम होते.

संस्थेचे संचालक दिलीपराव नागदकर, अप्पासाहेब देशमुख, प्राचार्य डॉ. विजय भोसले, उपप्राचार्य डॉ. बी.के. मग़र, प्रभारी प्राध्यापक व्ही.के. सलगरे, डॉ. एस.ए. गोर्डे, प्रा. के.एल. भानुसे, डॉ. उदय डोंगरे, सचिव ऊर्मिला आहेर आदींची मंचावर उपस्थिती होती.

यावेळी योगेश्वरी मिस्त्री म्हणाल्या की, योगाची व जिम्नॅस्टिकची परंपरा व संस्कार मला वडिलांकडून मिळाले. मी अभ्यासाबरोबरच खेळाकडे विशेष लक्ष दिले. मुलींना क्रीडा क्षेत्रात फारसे सहभागी होऊ दिले जात नाही; परंतु मला घरातूनच प्रेरणा मिळाली. माझ्या यशात महाविद्यालयाचा फार मोठा वाटा आहे. माझ्या हातून विद्यार्थी परिषदेचे उद्घाटन होणे हा माझा सर्वोच्च बहुमान आहे.

या सर्व वाटचालीत मला महाविद्यालयात खूप काही शिकायला, अनुभवायला मिळाले. स्नेहसंमेलन व विद्यार्थी परिषद विद्यार्थ्यांचे हक्काचे व्यासपीठ आहे. महाविद्यालयाने माझ्या जीवनाची पायाभरणी केली आहे, असे राहुल खरे यांनी सांगितले.

प्रास्ताविक करताना प्राचार्य डॉ. विजय भोसले यांनी विद्यार्थी ही आमची शक्ती आहे. या शक्तीच्या आधारे महाविद्यालयाला विकास साधायचा आहे. हे शैक्षणिक वर्ष महाविद्यालयाच्या इतिहासात यशाचे सर्वोच्च शिखर गाठणारे वर्ष आहे. क्रीडा, संगीत, कला, सांस्कृतिक क्षेत्रात विद्यार्थ्यांनी यश संपादन करून नावलौकिक वाढविला. काबाडकष्ट करणाऱ्या शेतकऱ्यांच्या मुलांचे हे यश आहे, असे भावोद्‌गार काढले. आपल्या महाविद्यालयाचे नाव विद्यार्थ्यांनी उज्ज्वल केले, याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे, असे प्रतिपादन डॉ. पी.के. निकम यांनी केले. यावेळी राहुल खरे व योगेश्वरी मिस्त्री यांच्या आई-वडिलांचा सत्कार करण्यात आला. विद्यार्थी परिषद सचिव ऊर्मिला आहेर यांनी अहवाल वाचन केले. डॉ. उदय डोंगरे व प्रा. के.एल. भानुसे यांनी परिचय करुन दिला. सूत्रसंचालन प्रा. अतिष मेहेत्रे यांनी केले. डॉ. सुशील गोर्डे यांनी आभार मानले. (वार्ताहर)

रऊफ शेख

सकाळ
औरंगाबाद, बुधवार, २९ जानेवारी २०१४



# शिवाजी महाविद्यालयात विद्यार्थी परिषदेचे उद्घाटन

## आंतरराष्ट्रीय योगा खेळाडू योगेश्वरी मिस्त्री, राहुल खरे यांनी साधला संवाद

**कन्नड, ता. २८ (बातमीदार)** : येथील शिवाजी महाविद्यालयात विद्यार्थी परिषदेचे उद्घाटन आंतरराष्ट्रीय योगा खेळाडू योगेश्वरी मिस्त्री व 'सारेगम' फेम राहुल खरे या बीए प्रथम वर्षात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या हस्ते मंगळवारी (ता. २८) झाले. अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव डॉ. पी. के. निकम होते. प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे संचालक दिलीप नागदकर, अप्पासाहेब देशमुख, प्राचार्य डॉ. विजय भोसले, उपप्राचार्य डॉ. पी. के. मगर, प्रा. व्ही. के. सलगरे, डॉ. एस. के. गोर्डे, प्रा. के. एल. भानुसे यांची उपस्थिती होती.

योगेश्वरी मिस्त्री म्हणाल्या की, योगा व जिम्नॅस्टिकची परंपरा व संस्कार मला वडिलांकडून मिळाले. अभ्यासासोबतच मी खेळाकडेही लक्ष दिले. माझ्या यशात महाविद्यालयाचाही मोठा वाटा आहे. राहुल खरे म्हणाले की, स्नेहसंमेलन व विद्यार्थी परिषद विद्यार्थ्यांचे हक्काचे व्यासपीठ आहे. महाविद्यालयाने माझ्या जीवनाची पायाभरणी केली. प्राचार्य डॉ. भोसले प्रास्ताविकात म्हणाले की, विद्यार्थी ही आमची शक्ती आहे. या शक्तीच्या आधारेच महाविद्यालयाचा विकास साधायचा आहे.

डॉ. निकम म्हणाले की, महाविद्यालय हे संस्कार व व्यक्तिमत्त्व विकासाचे केंद्र आहे. या वेळी योगेश्वरी व राहुल यांच्या आई-वडिलांचा सत्कार झाला. विद्यार्थी परिषदेची सचिव ऊर्मिला आहेर यांनी अहवाल वाचन केले. डॉ. उदय डोंगरे, प्रा. के. एल. भानुसे यांनी परिचय करून दिला. प्रा. अतीश मेहत्रे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. व्ही. के. सलगरे यांनी आनंदनगरीचे उद्घाटन केले. डॉ. सुनील गोर्डे यांनी आभार मानले.



कन्नड : शिवाजी महाविद्यालयाच्या विद्यार्थी परिषदेचे उद्घाटन करताना योगेश्वरी मिस्त्री, राहुल खरे, डॉ. पी. के. निकम, प्राचार्य डॉ. विजय भोसले, ऊर्मिला आहेर, दिलीप नागदकर, प्रा. व्ही. के. सलगरे, उपप्राचार्य डॉ. बी. के. मगर, डॉ. उदय डोंगरे.

दैनिक दिव्य मराठी ९
औरंगाबाद, शुक्रवार, ३१ जानेवारी २०१४

# शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारांचे वितरण



**पुणे :** तब्बल तीन वर्षे रखडलेल्या प्रतिष्ठेच्या शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार वितरण सोहळ्याच्या उरकाउरकीचा कार्यक्रम आज मंगळवारी (दि. ११) बालेवाडीतील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलात पार पडला. राज्यपालांचे तर कार्यक्रम पत्रिकेत नावच नव्हते, त्यामुळे त्यांच्या येण्याचा प्रश्नच नव्हता. राज्याचे क्रीडामंत्री पद्माकर वळवी आणि क्रीडा राज्यमंत्री उदय सामंत यांनी अवघ्या दोन तासांत ११५ पुरस्कारार्थींना गौरविण्याची औपचारिकता पूर्ण केली. क्रीडा संकुलातील बॅडमिंटन हॉलमध्ये २००९-१०, २०१०-११ व २०११-१२ या तीन वर्षांतील शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार प्रदान करण्यात आले. महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेचे सरचिटणीस बाळासाहेब लांडगे व मानसोपचारतज्ज्ञ व प्रशिक्षक म्हणून गेली ३० वर्षांपासून कार्यरत ▶▶ पान ५ वर

## मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांची दांडी

या पुरस्कार सोहळ्याला मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री उपस्थित राहतील, अशी अपेक्षा होती. मात्र, दोघांनीही अनुपस्थित राहत राज्य शासनाची क्रीडा क्षेत्राबद्दलची उदासीनता पुन्हा एकदा दाखवून दिली. पुरस्कारविजेते व समारंभाला आलेल्या नागरिकांनीही याबद्दल नाराजी व्यक्त केली. दिल्लीमध्ये महत्त्वाचे काम असल्यामुळे दोघेही कार्यक्रमाला येऊ शकले नाहीत, अशी सारवासारव क्रीडा राज्यमंत्री उदय सामंत यांनी आपल्या मनोगतात केली.

34

सकाळ
औरंगाबाद, गुरुवार, ६ फेब्रुवारी २०१४
३



कन्नड : ंत विद्यार्थ्यांचा सत्कार करताना मानसिंह पवार.

# मल्लखांबमध्ये प्रावीण्य मिळविण्यासाठी सराव हवा

## योगेश्वरी मिस्त्री : गौताळा व्हॅली स्कूलचे स्नेहसंमेलन

कन्नड, ता. ५ (बातमीदार) : योगा तसेच रोप अथवा मल्लखांबमध्ये प्रावीण्य मिळविण्यासाठी लहानपणापासून सरावाची आवश्यकता आहे. पालकांनी बालकांना त्यांची रुची ओळखून संधी, सोयी व सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, असे आवाहन आंतरराष्ट्रीय योगा-अभ्यासक योगेश्वरी मिस्त्री यांनी केले.

शहरातील गौताळा व्हॅली स्कूलचे स्नेहसंमेलन नुकतेच झाले. अध्यक्षस्थानी छत्रपती शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मानसिंह पवार होते. यानिमित्त योगेश्वरी मिस्त्री यांनी रोप व मल्लखांबाचे प्रात्यक्षिक सादर केले. त्या म्हणाल्या, की लहानपणापासून अभ्यास-सराव केल्यास लवचिकता प्राप्त होऊन खेळामध्ये निपुणता प्राप्त होते. कौशल्ये सहज विकसित होतात. या वेळी विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. शालेय, क्रीडा, सांस्कृतिक कार्यक्रम, स्पर्धेमध्ये प्रावीण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले.



आंतरराष्ट्रीय योगा खेळाडू योगेश्वरी मिस्त्री रोप मल्लखांबाचे प्रात्यक्षिक दाखविताना.

अशोक आहेर, दिलीप नागदकर, डॉ. डी. डी. शिंदे, डॉ. पी. के. निकम, बाबासाहेब मोहिते

एन. डी. भोसले, डॉ. ए. के. महाले, प्राचार्य डॉ. विजय भोसले, प्राचार्या

मागील चौदा महिन्यांमध्ये भारताने क्रीडा क्षेत्रातील भ्रष्टाचार संपवण्यासाठी महत्त्वाची पावले उचलली आहेत. या काळात अनेक खेळाडू, तसेच क्रीडा प्रेमींनी सरकारसमोर आपली मते मांडली. हीच मते सरकारने आयओसीपर्यंत पोहचवली.

- जितेंद्र सिंह, केंद्रीय क्रीडामंत्री





# शिवछत्रपती पुरस्कारांकडे मुख्य

## उपमुख्यमंत्र्यांचीही पुरस्कार वितरण सोहळ्यास अनुपस्थिती; क्री

म. टा. प्रतिनिधी, पुणे



राज्यातील गुणवंत खेळाडूंचे जाहीर कौतुक करण्यासाठी, त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी आयोजिलेल्या शिवछत्रपती पुरस्कार वितरण सोहळ्याकडे मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंगळवारी पाठ फिरवली. तीन वर्षांनंतर होत असलेल्या आणि गाजावाजा करून आयोजिलेल्या या सोहळ्याला हे दोन्ही नेते न आल्याने क्रीडा क्षेत्रातून नाराजी व्यक्त होत आहे.

म्हाळुंगे-बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडानगरीत मंगळवारी शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार वितरण सोहळा झाला. मुख्यमंत्री चव्हाण यांच्या हस्ते आणि उपमुख्यमंत्री पवार यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा होणार होता. मात्र, या दोघांनीही दांडी मारली. दिल्लीत बैठकीसाठी गेल्याने, ते आले नसल्याचे सांगण्यात आले. २००९-१०पासूनचे म्हणजे तीन वर्षांचे पुरस्कार रखडले होते. अखेर पुरस्कार जाहीर करून सरकारने वितरणाचा मुहूर्तही काढला. मात्र, त्याकडे सरकारमधील दोन प्रमुख नेत्यांनी पाठ फिरवली.

मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या अनुपस्थितीत, क्रीडामंत्री पद्माकर वळवी, क्रीडा राज्यमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते ११५ खेळाडू, संघटक कार्यकर्ते, मार्गदर्शक यांना पुरस्काराने गौरविण्यात आले. कुस्ती संघटक बाळासाहेब लांडगे, स्पोर्ट्स सायकोलॉजिस्ट भीष्मराज बाम यांना शिवछत्रपती राज्य जीवनगौरव पुरस्काराने गौरविण्यात आले. जीवनगौरव पुरस्कार जाहीर झालेले नागपूरचे अटल बहादूरसिंग आजारी असल्याने ते उपस्थित राहू शकले नाही. पुण्याच्या महापौर चंचला कोद्रे, पिंपरी-चिंचवडच्या मोहिनी लांडे, आमदार संग्राम थोपटे, भाऊसाहेब कांबळे, क्रीडा सचिव अश्विनी भिडे, क्रीडा आयुक्त पंकज कुमार आदी या वेळी उपस्थित होते.

### अवतरले तारांगण!

जवळजवळ तीन वर्षांच्या प्रतीक्षेनंतर का होईना, राज्यातील हा प्रतिष्ठेचा पुरस्कार मिळत असल्याने खेळाडूंमध्ये आनंदाचे वातावरण होते. क्रीडानगरीतील बॅडमिंटन हॉलमध्ये क्रीडाक्षेत्रातील ताऱ्यांची जणू मांदियाळी होती. गुलाबी रंगाचे फेटे घातलेले खेळाडू, संघटक, कार्यकर्ते सर्वांचेच लक्ष वेधून घेत होते.

### उशिरा का होईना ...

'उशिरा का होईना; पण आज चांगला योग आला आहे. तीन वर्षांचे ११५ पुरस्कार दिले जात आहेत. आपण शालेय क्रीडा स्पर्धेत देशात दुसऱ्या क्रमांकावर आहोत. आता २०-२५ खेळांना नव्याने मान्यता दिली आहे. या वर्षी महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर येईल, असा मला विश्वास आहे. नव्या क्रीडा धोरणानुसार ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेत्याला एक कोटीचे आणि क्रीडा मार्गदर्शकाला २५ लाख रुपयांचे बक्षिस दिले जाईल. स्कूल गेम्स फेडरेशनतर्फे आयोजित राष्ट्रीय शालेय स्पर्धेतील पदक विजेत्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ केली आहे. राज्य सरकारतर्फे पूर्वी राष्ट्रीय शालेय स्पर्धेतील सुवर्णविजेत्याला नऊ हजार रुपये दिले जात होते. त्यात वाढ करण्यात आली आहे. सुवर्णविजेत्याला आता ११,२५० रुपये दिले जाणार आहे,' अशी माहिती क्रीडामंत्री पद्माकर वळवी यांनी दिली.

### पुरस्कार दरवर्षीच द्यायला हवेत...

दरवर्षी पुरस्कार दिले जावेत यासाठी मुख्यमंत्र्यांकडे आग्रह धरणार असल्याचे आणि खेळाडूंना त्या-त्या वर्षी पुरस्काराने गौरविण्यासाठी आम्ही प्रयत्न करणार असल्याचे क्रीडा राज्यमंत्री उदय सामंत यांनी सांगितले. राज्य ऑलिम्पिक स्पर्धेसंदर्भात सामंत म्हणाले, 'राज्य ऑलिम्पिक स्पर्धेसाठी पाच कोटी रुपये उपलब्ध करून दिले आहेत. ही स्पर्धा येणाऱ्या कालावधीत होणार आहे. या स्पर्धेसाठी लवकर 'जीआर' काढण्याची आवश्यकता आहे.'

### 'हा तर खेळाडूंचा अवमान'

■ मुंबई : महाराष्ट्राच्या क्रीडाक्षेत्रातील प्रतिष्ठेचे शिवछत्रपती राज्य पुरस्कारांची घोषणा तब्बल तीन वर्षे विलंबाने करून राज्यातील क्रीडापटूंची अवहेलना करणाऱ्या राज्यातील काँग्रेस आघाडी सरकारचे मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुरस्कार वितरण सोहळ्याला दांडी मारून राज्यातील हजारो क्रीडापटूंचा अवमान केला आहे. ही घटना राज्याच्या क्रीडाक्षेत्रांसाठी अतिशय निषेधार्ह असल्याची प्रतिक्रिया विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते विनोद तावडे यांनी दिली.



औरंगाबादची आं
करताना क्रीडा मं

# क्रीडा

बुधवार, दि. १२ फेब्रुवारी २०१४ नऊ | सामना

## ग्रामपंचायतींनी क्रीडांगणांच्या वि

कन्नड : तालुक्यात क्रीडा योजनेचा निधी जवळपास २० ग्रामपं
करावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी ऊर्मिला मोराळे यांनी के
अधिकारी साहेबराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. बै
दिगर, हतनूर, नागापूर, नागद, अंधानेर, सायगव्हाण, ताडपिंपळगाव,
तालुका क्रीडा अधिकारी खिल्लारे, ग्रामसेवक संघटनेचे जिल्हा उपाध्य
अरुण गोर्डे, माणिक पगारे, बी.डी. राठोड, विनायक पवार, पोपट शि
पूर्वसूचना न दिल्यामुळे तहसीलदार महेश सुधोळकर हे बैठकीस हज

# शिवछत्रपती पुरस्कार वितरणाला मुख्यमं

## ■ बाळासाहेब लांडगे, भीष्मराज बाम यांना जीवनगौरव




संभाजीनगरची आंतरराष्ट्रीय नेमबाज तेजस्विनी मुळेने क्रीडा मंत्री पद्माकर वळवी आणि राज्यमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारला.

पुणे : तब्बल तीन वर्षे रखडलेल्या प्रतिष्ठेच्या शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार वितरण सोहळ्याच्या उरकाउरकीचा कार्यक्रम आज बालेवाडीतील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलात पार पडला. न्यायालयाची या सोहळ्याला सशर्त परवानगी मिळाल्याने धाबे दणाणलेले मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या कार्यक्रमाकडे न फिरकणेच पसंत केले. राज्यपालांचे तर कार्यक्रम पत्रिकेतच नाव नव्हते, त्यामुळे त्यांच्या येण्याचा प्रश्नच नव्हता. राज्याचे क्रीडामंत्री पद्माकर वळवी आणि क्रीडा राज्यमंत्री उदय सामंत यांनी अवघ्या दोन तासात ११५ पुरस्कारार्थींना गौरविण्याची औपचारिकता पूर्ण केली.

क्रीडासंकुलातील बॅडमिंटन हॉलमध्ये २००९-१०, २०१०-११ व २०११-१२ या तीन वर्षांतील शिवछत्रपती

### मराठवाड्यातील मंगल पा
### कार्तिकी शिरडकर, रोहिण

क्रीडा पुरस्कार प्रदान करण्यात आले. महाराष्ट्र ऑलि
संघटनेचे सरचिटणीस बाळासाहेब लांड
मानसोपचारतज्ज्ञ व प्रशिक्षक म्हणून गेली ३० वर्षां
कार्यरत असलेले भीष्मराज बाम यांना मान
जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात अ
नागपूरचे अटल बहादूरसिंग प्रकृती अस्वास्थ
पुरस्कार वितरण सोहळ्यास उपस्थित राहु शकले
त्यांच्या वतीने नागपूर विभागाचे क्रीडा उपसंच
विजय संतान यांनी जीवनगौरव पुरस्कार स्विक
याचबरोबर उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक, जिजामाता




'मानाचा जीवनगौरव पुरस्कार मिळाला त्यामुळे आनंद होणे साहजिकच आहे. मात्र, या पुरस्काराने जबाबदारीत वाढ झाल्याची जाणीव झाली. ऑलिम्पिकमध्ये महाराष्ट्रातील जास्तीत जास्त खेळाडूंनी देशाला पदके जिंकून द्यावी, यासाठी पाहिजे तेवढे प्रयत्न करू. आगामी मिनी ऑलिम्पिकमध्ये जे खेळाडू चमकदार कामगिरी करतील, त्यांना शासनाने सर्वतोपरी मदत करावी. जेणेकरून या वर्षी राष्ट्रकुलसह होणाऱ्या इतर क्रीडा स्पर्धेतही महाराष्ट्राचे खेळाडू पदकांची लयलूट करतील, याचा मला विश्वास आहे.'

– बाळासाहेब लांडगे
(जीवनगौरव पुरस्कारविजेते)




'जीवनगौरव पुरस्काराने आनंद झाला असला तरी मला खरा आनंद खेळाडूंना मार्गदर्शन करण्यात मिळतो. मात्र, समाज, शासन व प्रशासकीय अधिकारी यांना खेळाचे महत्त्व पटवून देण्याची गरज आहे. समाजच खेळाकडे गंभीरतेने पाहत नाही, त्यामुळे केवळ शासनाला दोषी ठरविणेही चुकीचे आहे. १८ वर्षांपर्यंतच्या मुला-मुलींना सैनिकी शिक्षण किंवा क्रीडा क्षेत्र अनिवार्य करायला हवे. तरच खेळाबरोबर मानसिक विकासही होईल.'

– भीष्मराज बाम
(जीवनगौरव पुरस्कारविजेते)



'मी चार महिन्यापूर्वी क्रीडा राज्यमंत्री झालो अन् तब्बल तीन वर्षांपासून रखडलेल्या शिवछत्रपती पुरस्कारांना मुहूर्त मिळाला. माझ्या पायगुणामुळेच हे घडले, असा उपरोधिक घरचा आहेर उदय सामंत यांनी लगावला. आता आगामी शिवछत्रपती पुरस्कार दरवर्षी देण्याचा प्रयत्न करू. देशासाठी पदके जिंकणाऱ्या खेळाडूंच्या प्रमाणपत्रावर स्वाक्षरी करण्याची संधी मिळाली, हे मी माझे भाग्यच मानतो.'

उदय सामंत
(क्रीडा राज्यमंत्री)



'शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार तीन वर्षे रखडले त्याबद्दल मी प्रथमतः दिलगिरी व्यक्त करतो. मात्र, मला राज्याचा क्रीडामंत्री होऊन तीन वर्षे झाली. हे पुरस्कार लवकरात लवकर मिळावे, यासाठी मी सातत्याने प्रयत्न केले. प्रशासकीय आणि तांत्रिक बाबींमुळे काही अडचणीही आल्या. मात्र, सर्व पुरस्कारार्थींची निवड पारदर्शीपणे करण्यात आली, याचा आनंद वाटतो.'

– पद्माकर वळवी
(राज्य क्रीडामंत्री)



तब्बल

37



शिवछत्रपती क्रीडानगरीत मंगळवारी शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. त्या वेळी पुरस्कार वितरणाच्या प्रतीक्षेत पुरस्कारार्थी.

# शिवछत्रपती पुरस्काराबाबत पुन्हा गोंधळ हो

## क्रीडा राज्यमंत्री उदय सामंत यांची ग्वाही

क्रीडा प्रतिनिधी, पुणे



राज्याचे क्रीडामंत्री पद्माकर वळवी व राज्यमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते जीवनगौरव पुरस्कार स्वीकारताना बाळासाहेब लांडगे (डावीकडे) आणि डॉ. भीष्मराज बाम.

शिवछत्रपती पुरस्कार जाहीर होण्यास तीन वर्षे विलंब झाल्याबद्दल दिलगिरी व्यक्त करताना क्रीडा राज्यमंत्री उदय सामंत यांनी असा गोंधळ पुन्हा होणार नाही, अशी ग्वाही मंगळवारी पुण्यातील बालेवाडी येथे झालेल्या पुरस्कार वितरण समारंभात दिली.

राज्य शासनातर्फे दरवर्षी सर्वोत्कृष्ट खेळाडू, संघटक, प्रशिक्षकांना शिवछत्रपती पुरस्कार दिला जातो. मात्र गेली तीन वर्षे हा पुरस्कार जाहीर करण्यात आला नव्हता आणि पर्यायाने त्याचे वितरणही झाले नव्हते. नुकतेच या तीन वर्षांचे पुरस्कार जाहीर करण्यात आले. २००९-१०, २०१०-११, २०११-१२ या वर्षांचे पुरस्कार देऊन मंगळवारी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते पुरस्कारविजेत्यांना मंगळवारी सन्मानित करण्यात येणार होते. मात्र हे दोघेही नेते गैरहजर राहिले.

हा पुरस्कार दरवर्षी जाहीर झालाच पाहिजे व त्याचे वितरणही लगेच व्हायला पाहिजे. असा विलंब होणे उचित नाही, असे सांगत त्यांनी आपल्याच खात्याबाबत नाराजीही व्यक्त केली.

गेली तीन वर्षे हा समारंभ न झाल्यामुळे आल्यामुळेच पुरस्कार जाहीर झाले, असे सांगून श्रेय लाटण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या या वक्तव्यावर उपस्थित क्रीडाप्रेमींमध्ये हास्याचे फवारेच उडाले.

मुख्य वक्त्यांच्या अनुपस्थितीत सामंत तसेच काही नवीन घोषणा ते करतील अशी अपेक्षा होती. मात्र यापूर्वीच जाहीर झालेल्या क्रीडा धोरणातील काही तरतुदी त्यांनी पुन्हा येथे मांडल्या.

''तालुकास्तरावर निर्माण करण्यात आलेल्या बांधकामांसाठी सात लाख रुपयांचे अनुदान दिले जाणार आहे. कबड्डी व कुस्तीच्या विकासाकरिता आंतरराष्ट्रीय दर्जाची अधिकाधिक मॅट्स देण्यासाठी शासकीय अनुदान दिले जाणार आहे. ऑलिम्पिक सुवर्णपदक मिळविणाऱ्या

दैनिक दिव्य मराठी

औरंगाबाद, सोमवार, २६ मे २०१४

# डॉ. डोंगरे, काटुळे राज्य संघटनेवर

## राज्य तलवारबाजी संघटना : उस्मानाबादचे सोमवंशी खजिनदारपदी

क्रीडा प्रतिनिधी | सोलापूर

राज्य तलवारबाजी संघटनेच्या अध्यक्षपदी सोलापूरचे प्रकाश काटुळे, खजिनदारपदी उस्मानाबादचे राजकुमार सोमवंशी, तर सरचिटणीसपदी औरंगाबादच्या डॉ. उदय डोंगरे यांची बैठकीत सर्वानुमते निवड झाली.

सोलापूर येथे झालेल्या महाराष्ट्र तलवारबाजी संघटनेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत २०१४ ते २०१९ या कालावधीसाठी पदाधिकारी व सदस्यांची निवड करण्यात आली. डॉ. अशोक दुधारे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली



प्रकाश काटुळे

**कार्यकारिणी**

अध्यक्ष - प्रकाश काटुळे (सोलापूर), कार्याध्यक्ष - प्रमोद वानखेडे (अमरावती), उपाध्यक्ष - चंद्रकांत सोनवणे (जळगाव), पद्माकर जगदाळे (सांगली), शेषनारायण लोंढे (बुलडाणा), सुधीर कहाते (वर्धा), सरचिटणीस डॉ. उदय डोंगरे (औरंगाबाद), चिटणीस डॉ. पांडुरंग रनमाळ (परभणी), अविनाश दुधाने (पुणे), विलास वाघ (ठाणे), शोएब मोहंमद (नागपूर), खजिनदार- राजकुमार सोमवंशी (उस्मानाबाद), सदस्य - डॉ. अभिजित मोरे (लातूर), राजू शिंदे (नाशिक), राहुल वाघमारे (मुंबई शहर), आर. आर. पवार (वाशीम), विनय जाधव (कोल्हापूर), दिलीप घोडके (नगर), केदार ढवळे (मुंबई उपनगर), संजय इसाळकर (अकोला).

शनिवार, ३१ मे २०१४

पुण्य नगरी औरंगाबाद

# तलवारबाजी संघटनेच्या सचिवपदी डॉ. डोंगरे



औरंगाबाद :डॉ. उदय डोंगरे यांची राज्य तलवारबाजी संघटनेच्या सचिवपदी निवड झाली आहे. महाराष्ट्र राज्य तलवारबाजी संघटनेची सोलापूर येथे नुकतीच सर्वसाधारण सभा होऊन २०१४ ते २०१९ यासाठीच्या कार्यकारिणीची निवड झाली. यात डॉ. डोंगरेंची सचिव म्हणून बिनविरोध निवड करण्यात आली. राज्य तलवारबाजी संघटनेची कार्यकारिणी - अध्यक्ष- प्रकाश काटुळे (सोलापूर), कार्याध्यक्ष -प्रमोद वानखेडे (अमरावती), उपाध्यक्ष- चंद्रकांत सोनवणे (जळगाव), पद्माकर जगदाळे (सांगली), शेषनारायण लोढे (बुलढाणा), सरचिटणीस- डॉ. उदय डोंगरे (औरंगाबाद), चिटणीस- पांडुरंग रणमाळ (परभणी), अविनाश दुधाणे (पुणे), शोएब महंमद (नागपूर), खजीनदार- राजकुमार सोमवंशी (उस्मानाबाद), सदस्य- अभिजित मोरे (लातूर), राजू शिंदे (नाशिक), राहुल वाघमारे (मुंबई शहर), आर. आर. पवार (वाशिम), विनय जाधव (कोल्हापूर), दिलीप घोडके (अहमदनगर), केदार ढवळे (मुंबई उपनगर), संजय इसाळकर (अकोला), श्रीकांत देशमुख (जालना), सुधीर जमदाडे (सातारा), राहुल वाघमारे (नांदेड), अनिल रावले (हिंगोली), अर्जुन मोरे (बीड) आदी.

# WANTED

Application are invited from the eligible candidates for the following posts of Asst. Professors to be filled in **Shivaji Arts, Commerce & Science College Kannad, Tq. Kannad, Dist. Aurangabad** (Granted) run by Shri Chhatrapati Shivaji Shikshan Prasarak Mandal. The eligible candidate should submit their application along with all documents within fifteen days from the date of publication of the advertisement. The candidates of reserved category should submit one copy of application to the Assistant Registrar, Special Cell, Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University Aurangabad.

| Sr. No. | Subject | No. Posts | Full Time/ Part Time | Reservation |
|---|---|---|---|---|
| 01 | English | 03 | Full Time | 1 Open, 1 OBC, 1 ST |
| 02 | Sociology | 01 | Full Time | Open |
| 03 | Commerce | 02 | Full Time | 1 Open, 1 SBC |
| 04 | Botany | 01 | Full Time | 1 ST |

**Educational Qualification:** ▶ A master degree with at least 55% marks (or an equivalent grade in point scale wherever grading system is followed) by a recognized university or its equivalent grade and good academic record. ▶ Beside full fling above qualification the candidate must have cleared NET or SET conducted by the UGC. ▶ Notwithstanding anything contained in sub-clauses (i) & (ii) to this clause 4:4:1 candidates, who are have been awarded a Ph.D. degree in accordance with the UGC (minimum standards and procedure for the awarded of Ph.D. degree) regulation 2009 shall be exempted from NET/SET conditions for appointment of Assistant Professor. ▶ A minimum score as stipulated in the academic indicator (API) based on stipulated in the academic performance based appraisal system (PBAS) for Asst. Professors as developed by UGC, Govt. of India and Maharashtra State Govt. Notification 2010 and educational qualification recommended by UGC and State Govt. from time to time.

**Salary and Allowances:** Pay Scale and allowances as per the UGC, State Govt. and Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University Aurangabad rules from time to time.

**Note:** ▶ There will be relaxation of 5% marks at PG level for SC/ST/ Handicapped person. ▶ 30% and 3% posts will be reserved for Women and Handicapped person respectively. ▶ As per GR dated 29/03/1997 VJ/NT will be interchangeable. ▶ No TA/DA will be paid for attending the interview. ▶ All attested photo copies of certificates and other relevant documents should be attached with applications. ▶ The candidates of reserved category also apply for open posts. ▶ Reserved posts filled as per GR 22/1/2014

**Please visit our website - www.shivajicollegekannad.org**

**Address for correspondence: The Principal, Shivaji Arts, Commerce & Science College Kannad, Tq. Kannad (431103) Dist. Aurangabad (MS)**

**Dr. D.D. Shinde**
Treasurer

**Dr. P.K. Nikam**
Secretary

**Shri. A.A. Aher**
Vice-President

**Shri.M.B. Pawar**
President

**Dr. V.N. Bhosale**
Principal

41

सकाळ
औरंगाबाद, गुरुवार,
२६ जून २०१४



पुणे : उदय डोंगरे लिखित ऑलिंपिक, राष्ट्रकुल आणि आशियाई क्रीडा पुस्तकाचे प्रकाशन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते पुण्यात झाले. यावेळी नामदेव शिरगावकर, बाळासाहेब लांडगे.

# उदय डोंगरे यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

**औरंगाबाद, ता. २५ :** 'ऑलिंपिक, राष्ट्रकुल आणि आशियाई क्रीडा स्पर्धा' या डॉ. उदय डोंगरे लिखित पुस्तकाचे प्रकाशन राज्य ऑलिंपिक समितीचे अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते पुण्यात झाले. ऑलिंपिक दिनानिमित्त हे प्रकाशन झाले. राष्ट्रीय ऑलिंपिक समितीचे सदस्य नामदेव शिरगावकर, राज्य समितीचे सचिव बाळासाहेब लांडगे प्रमुख उपस्थित होते. प्रमुख खेळांची शास्त्रशुद्ध माहिती उपलब्ध व्हावी आणि पदक विजेत्या खेळाडूंचा आदर्श नव्या खेळाडूंसमोर मांडण्याचा याद्वारे प्रयत्न केला असल्याची माहिती कन्नड येथील शिवाजी महाविद्यालयातील प्राध्यापक, लेखक श्री. डोंगरे यांनी दिली.

epaper.saamana.com
गुरुवार, दि. २६ जून २०१४ सामना

# ऑलिम्पिक राष्ट्रकुल व आशियाई क्रीडा पुस्तकाचे प्रकाशन

संभाजीनगर, दि. २५ (क्री.प्र.) - महाराष्ट्र राज्य तलवारबाजी संघटनेचे सरचिटणीस डॉ. उदय डोंगरे यांनी ऑलिम्पिक, राष्ट्रकुल व आशियाई खेळाची माहिती जास्तीत जास्त प्रसारित व्हावी, तसेच ऑलिम्पिकमधील हिंदुस्थानी पदक विजेत्यांची नवोदित खेळाडूंना माहिती मिळावी, यासाठी 'ऑलिम्पिक, राष्ट्रकुल व आशियाई क्रीडा' या पुस्तकाचे लेखन केले.

या जागतिक ऑलिम्पिक दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेच्या कार्यक्रमात राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. याप्रसंगी भारतीय ऑलिम्पिक संघटनेचे सदस्य नामदेव शिरगावकर, महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेचे सरचिटणीस बाळासाहेब लांडगे यांच्यासह अनेक माजी ऑलिम्पिक खेळाडू व अर्जुन पुरस्कार विजेते उपस्थित होते. अजित पवार यांनी पुस्तकाबद्दल गौरवोद्गार काढले. त्याचप्रमाणे क्रीडा क्षेत्रात अधिक लिखाण होणे गरजेचे असल्याचे सांगितले. डॉ. उदय डोंगरे यांच्या पुस्तकाबद्दल अशोक दुधारे, प्रा. डॉ. व्ही. एन. भोसले, डॉ. रामचंद्र झाडे, एम. एम. खंडेलवाल, शंकर पतंगे, राकेश खैरनार, प्रदीप बोरसे, क्रीडा उपसंचालक चंद्रकांत कांबळे, प्रा. बुऱ्हाडे सुनील, प्रा. काशिद, डॉ. विजय मानकर, संजय भूमकर, डॉ. गोविंद बुरमे तसेच शिवाजी महाविद्यालय, कन्नड येथील प्राध्यापकांनी त्यांना शुभेच्छा देऊन अभिनंदन केले.



११ लोकमत औरंगाबाद, बुधवार, १७ सप्टेंबर २०१४



# क्रीडा संचालकपदी उदय डोंगरे

क्रीडा संचालकपदी निवड झाल्यानंतर कुलगुरु बी.ए. चोपडे यांच्या हस्ते उदय डोंगरे यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी फुलचंद सलामपुरे, विनोद नरवडे, दयानंद कांबळे, दिनेश वंजारे आदी.

**औरंगाबाद :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या शारीरिक शिक्षण विभागाच्या प्रभारी क्रीडा संचालकपदी डॉ. उदय डोंगरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मंगळवारी सायंकाळी त्यांनी डॉ. दयानंद भक्त यांच्याकडून पदभार स्वीकारला.

विद्यापीठातर्फे नोव्हेंबरमध्ये आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहे. उदय डोंगरे यांना स्पर्धा आयोजनाचा मोठा अनुभव आहे. या पार्श्वभूमीवर त्यांची क्रीडा संचालक पदावर झालेली नियुक्ती महत्त्वाची मानली जात आहे. विद्यापीठाचे कुलगुरु बी. ए. चोपडे

> विद्यापीठाच्या क्रीडा विभागाचा कारभार पारदर्शक करण्याचा प्रयत्न असणार आहे. आगामी क्रीडा महोत्सवाचे यशस्वी आयोजन करुन आपल्या विद्यापीठाच्या खेळाडूंना जास्तीत जास्त पदके कसे मिळविता येतील यावर विशेष भर देण्यात येणार आहे. त्याचबरोबर विद्यापीठातून राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय खेळाडू घडविण्याकडे विशेष लक्ष दिले जाईल.
>
> \- डॉ. उदय डोंगरे,
> (क्रीडा संचालक विद्यापीठ)

यांनी शुक्रवारी जिल्ह्यातील दहा क्रीडा प्राध्यापकांच्या या पदासाठी मुलाखती घेतल्या होत्या. त्यापैकी संचालक पदासाठी सरस्वती भुवन महाविद्यालयाचे डॉ. दयानंद कांबळे आणि कन्नड येथील शिवाजी महाविद्यालयाचे डॉ. डोंगरे यांच्यात चुरस होती. त्यात डोंगरे यांनी बाजी मारली. डोंगरे यांनी सायंकाळी उशिरा माजी क्रीडा संचालक दयानंद भक्त यांच्याकडून पदभार स्वीकारला. विद्यापीठाचे कुलगुरु बी. ए. चोपडे यांनी उदय डोंगरे यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. या प्रसंगी दयानंद कांबळे, फुलचंद सलामपुरे, विनोद नरवडे, संभाजी वाघमारे, दिनेश वंजारे, संदीप जगताप, प्रदीप खांड्रे, श्रीनिवास मोतियळे यांची उपस्थिती होती.

(क्रीडा प्रतिनिधी)

दैनिक दिव्य मराठी

औरंगाबाद, शुक्रवार १ एप्रिल, २०१६

# कन्नड शहरात राज्य बास्केटबॉल स्पर्धा शनिवारपासून

प्रतिनिधी | औरंगाबाद

माजी आमदार नितीन पाटील मित्रमंडळ, शिवाजी महाविद्यालय आणि जिल्हा बास्केटबॉल संघटनेच्या संयुक्त विद्यमाने निमंत्रितांच्या राज्यस्तरीय पुरुष गट बास्केटबॉल स्पर्धेचे २ ते ४ एप्रिलदरम्यान कन्नड येथील शिवाजी महाविद्यालयात आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेत १२ संघांचे १४४ खेळाडू सहभागी होणार आहेत. या स्पर्धा साखळी आणि बाद पद्धतीने खेळवली जाईल.

स्पर्धेचे उद्घाटन २ एप्रिल रोजी सायंकाळी ७ वाजता माजी मंत्री व आमदार अब्दुल सत्तार यांच्या हस्ते होईल. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार सुभाष झांबड असतील. याप्रसंगी आयोजक माजी आमदार नितीन पाटील, उद्योजक मानसिंग पवार, काँग्रेस जिल्हाध्यक्ष केशवराव औताडे, डॉ. बाबासाहेब मोहिते, राज्य संघटनेचे उपाध्यक्ष जयंत देशमुख, सचिव गोविंद मुथुकुमार, प्राचार्य डॉ. विजय भोसले, डॉ. उदय डोंगरे, जिल्हा सचिव गणेश कड यांच्या उपस्थितीत होईल. त्यामुळे जिल्हाभरातील क्रीडाप्रेमींनी मोठ्या संख्येने या कार्यक्रमाला उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

औरंगाबाद, सोमवार ४ एप्रिल, २०१६

दैनिक दिव्य मराठी

# भारतीय नौदल, मुंबई, श्रीरामपूर संघ विजयी



औरंगाबाद | माजी आमदार नितीन पाटील मित्रमंडळ, श्री छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ व औरंगाबाद जिल्हा बास्केटबॉल संघटनेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित निमंत्रितांच्या राज्यस्तरीय बास्केटबॉल स्पर्धेत भारतीय नौदल, मुंबई, महाराष्ट्र पोलिस आणि श्रीरामपूर या संघांनी साखळी सामन्यात विजयी सुरुवात केली. कन्नड येथील शिवाजी महाविद्यालयाच्या मैदानावर सुरू असलेल्या स्पर्धेत भारतीय नौदल संघाने बीड संघावर ८४-६५ बास्केट गुणांनी शानदार विजयाची नोंद केली. दुसऱ्या लढतीत महाराष्ट्र पोलिस संघाने नांदेड संघावर ७४-४१ बास्केटने एकतर्फी विजय मिळवला. तिसऱ्या लढतीत श्रीरामपूर संघाने चाळीसगाव संघावर ५६-३१ गुणांनी मात केली. चौथ्या लढतीत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत मुंबई-घाटकोपर संघाने जळगावला ५९-३४ गुणांनी पराभवाची धूळ चारली.

महाराष्ट्र टाइम्स, औरंगाबाद ■ सोमवार, ४ एप्रिल २०१६

# बीड, इंडियन नेव्ही, मुंबई संघांची आगेकूच

म. टा. प्रतिनिधी, औरंगाबाद

कन्नड येथे आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय निमंत्रित बास्केटबॉल स्पर्धेत बीड, इंडियन नेव्ही, श्रीरामपूर, एमएसपी मुंबई, महाराष्ट्र पोलिस या संघांनी रविवारी झालेल्या सामन्यांत प्रतिस्पर्धी संघांवर विजय नोंदवले.

**राज्यस्तरीय बास्केटबॉल स्पर्धा**

औरंगाबाद जिल्हा बास्केटबॉल संघटना, माजी आमदार नितीन पाटील मित्र मंडळ व श्री छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने ही या स्पर्धा कन्नड येथे आयोजित करण्यात आली आहे. रविवारी शिवाजी कॉलेजमध्ये या स्पर्धेला प्रारंभ झाला. सलामीच्या लढतीत बीड संघाने घाटकोपर संघाचा अटीतटीच्या झुंजीत ४६-४५ असा पराभव केला. इंडियन नेव्ही संघाने जळगावचा ७३-२६ असा, तर बीड संघाचा ८४-६५ असा पराभव करून आगेकूच केली. श्रीरामपूर संघाने नांदेड संघाला ५१-४४ असे हरवले. एमएसपी मुंबई संघाने चाळीसगाव संघावर ४८-२७ अशी मात केली. महाराष्ट्र पोलिस संघाने नांदेड संघाला ७४-४१ असे सहज पराभूत केले. श्रीरामपूर संघाने चाळीसगाव संघावर ५६-३१ असा विजय मिळवून पुढील फेरीमध्ये प्रवेश केला.

या सामन्यांमध्ये अक्षय खरात, ऋषी, रवी चौरे, विश्वजित बहुरे, आशु देवदत्ता, साजीद शेख, अली इराणी, सागर राजपूत, जयेश, रामजू शेख या खेळाडूंना आपल्या संघातर्फे चांगली कामगिरी बजावली. पंच म्हणून विजय पिंपळे, राजू कणिसे, विश्वास कड, अभय चव्हाण, अभिजीत देवकर, विजय बहादुरे यांनी काम पाहिले.

**उद्घाटन सोहळा**

माजी आमदार नितीन पाटील, बाबासाहेब मोहिते यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी डॉ. उदय डोंगरे, संजय मठपती, गोपी खामकर, संयोजक सचिव गणेश कड, बाळासाहेब जाधव, प्रवीण शिंदे, शेख शाहिद, विक्रम चव्हाण, सय्यद रफिक, प्रशांत बुरांडे आदी उपस्थित होते. डॉ. उदय डोंगरे यांनी प्रास्ताविक केले. प्रशांत बुरांडे व गणेश कड यांनी सूत्रसंचालन केले.



47

Per ID:11718

औरंगाबाद, मंगळवार ५ एप्रिल, २०१६
दैनिक दिव्य मराठी

# महाराष्ट्र पोलिस, इंडियन नेव्हीत फायनल रंगणार मंगळवारी

## राज्यस्तरीय बास्केटबॉल स्पर्धा; श्रीरामपूर, बीड संघाचे आव्हान संपुष्टात

क्रीडा प्रतिनिधी | औरंगाबाद

निमंत्रितांच्या राज्यस्तरीय बास्केटबॉल स्पर्धेच्या किताबासाठी महाराष्ट्र पोलिस आणि इंडियन नेव्ही यांच्यात फायनल रंगणार आहे. या दोन्ही संघांनी उपांत्य सामने जिंकून अंतिम फेरी गाठली. दुसरीकडे श्रीरामपूर आणि बीड संघाचे स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले. माजी आमदार नितीन पाटील मित्रमंडळ, छत्रपती शिवाजी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा कन्नड येथे आयोजित करण्यात आली.

महाराष्ट्र पोलिस संघाने उपांत्य सामन्यात रोमहर्षक विजयाची नोंद केली. या टीमने लढतीत बीडवर ६२-३९ अशा फरकाने विजय संपादन केला. यासह या संघाला अंतिम फेरीतील प्रवेश निश्चित करता आला. आंतरराष्ट्रीय खेळाडू शशांक कदम, संजय साळुंखे, नीलेश राऊत, महेश नागणे यांनी सरस खेळी करून विजयश्री खेचून आणली.

दुसरीकडे लोणावळ्याच्या इंडियन नेव्ही संघाने सेमीफायनलमध्ये धडाकेबाज विजय मिळवला. या संघाने सामन्यात श्रीरामपूरचा धुव्वा उडवताना ९७-३० ने विजय मिळवला.

या सामन्या दरम्यान स्टार आंतरराष्ट्रीय बास्केटबॉलपटू अखिलेश ताडू, महिपाल सिंग, आशू देवदत्ता, सौरभ, मनदीप सिंग, गोविंद, कुमारदीप, बिपिन धमन यांनी अव्वल कामगिरी करताना संघाच्या विजयात मोलाचे योगदान दिले. तसेच चाहत्यांना या सर्व अव्वल बास्केटबॉलपटूंच्या खेळीचा आनंद लुटण्याची संधी मिळाली. हे दोन्ही उपांत्य सामने पाहण्यासाठी अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



बास्केटबॉल स्पर्धेमध्ये खेळी करताना खेळाडू.